◆ जून २००५
◆ वर्ष पाचवे
◆ अंक सहावा

# मेहता मराठी ग्रंथजगत

✠ संपादक :
सुनील मेहता

✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

✠ संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

✠ अंकाची किंमत १५ रु.

✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— *अनुक्रमणिका* —

| | |
|---|---|
| **संपादकीय** - | ४ |
| **साहित्यवार्ता** | ८ |
| **पुस्तक परिचय** | |
| **सिटी ऑफ बोन्स** : अनु. अजित ठाकूर | २६ |
| **विज्ञानाचा समाज धारणेवरील परिणाम** : अनु. अनिल काळे | ३१ |
| **रंगीत चित्रांची मजेदार पुस्तके** | ३७ |
| **पुरस्कार** | ४४ |
| **साधंसुधं :** प्रमोदिनी वडके-कवळे | ५० |
| **श्रद्धांजली** | ५४ |
| **बालनगरी** | ५५ |

✠ मांडणी-अक्षरजुळणी :
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**
**Website - mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

### शतक साहित्य परिषदेचे

मराठी साहित्यक्षेत्रात सातत्याने कार्यरत असणाऱ्या संस्थांमध्ये महाराष्ट्र साहित्य परिषदेला अग्रक्रम आहे; आणि २७ मे २००५ रोजी साहित्य परिषद शतकमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे ही अभिमानाची बाब आहे असे सर्वसामान्य साहित्यप्रेमी व्यक्तीलाही वाटल्यावाचून राहू नये. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यक्षेत्र पूर्वी संपूर्ण महाराष्ट्र होते. पुढे विदर्भ, मराठवाडा, मुंबई यांचे कार्यक्षेत्र अलग झाले; आणि उर्वरित महाराष्ट्रातही कोकण मराठी साहित्य परिषद वगैरे संस्था निघाल्याने अ. भा. मराठी साहित्य महामंडळाच्या स्थापनेनंतर पूर्वीचा एकजिनसीपणा उरला नाही. ही वस्तुस्थिती असली तरी एकूण मराठी साहित्यविश्वात ऐतिहासिकदृष्ट्या आद्यसंस्था म्हणून आणि छोटीमोठी साहित्य संमेलने, उत्तम कलाकृतींना ग्रंथपुरस्कार, मराठी साहित्य परीक्षांचे आयोजन, अतिथीगृह, मुखपत्राचे प्रकाशन, मराठी साहित्याच्या इतिहास ग्रंथाचे प्रकाशन, संदर्भ ग्रंथालय, वगैरे उपक्रमांमधली नियमितता टिकवणारी गतिमान संस्था म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषदेला मानाचे स्थान आहेच. सात आठ हजारांच्या घरात असणारी सभासदसंख्या या परिषदेची सर्वसमावेशकता आणि लोकाभिमुखता यांची निदर्शक आहे.

मराठीत ग्रंथकार संमेलने ही १८७८ पासून भरू लागली. म. गो. रानडे (१८७८), कृष्णशास्त्री राजवाडे (१८८५) यांच्या अध्यक्षतेखालील दोन संमेलनानंतर तिसरे संमेलन १९०५ साली सातारला भरले.

१९०६ साली लोकमान्य टिळक यांनी चौथ्या ग्रंथकार संमेलनात साहित्यक्षेत्रात योजनापूर्वक काम करणारी एखादी संस्था असावी अशी कल्पना मांडली. राजकारणामुळे देशभर वावर असणारे लोकमान्य; त्यांनी हिंदी आणि बंगाली भाषांमधील साहित्य चळवळी बघितलेल्या होत्या; त्या धर्तीवर मराठीतही काहीतरी उपक्रम होत राहावेत असे त्यांना जाणवले. ग्रंथकार संमेलनाच्या निमित्ताने त्यांनी या कल्पनेचा जाहीर उच्चार केला; आणि त्याप्रमाणे एक संस्था स्थापन करण्याचे 'मळेकर वाड्यातच' ठरले. नागनाथपाराजवळच्या या वाड्यातच संमेलन भरले होते. त्याचे अध्यक्ष गोविंदराव कानिटकर होते. पहिले कार्यवाह कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर आणि नरसिंह चिंतामण केळकर यांजकडे मानाचे पान जाते. १९१२ मध्ये



महाराष्ट्र साहित्य परिषदेची घटना बनवण्यात आली आणि त्या वर्षी अकोला येथे भरलेल्या संमेलनाचे अध्यक्ष हरिभाऊ आपटे यांना घटना मंजुरीनंतरच्या परिषदेच्या पहिल्या अध्यक्षपदाचा सन्मान प्राप्त झाला; असे सांगण्यात येते. म. सा. परिषदेवर म.श्री. दीक्षित यांनी एक माहितीपर पुस्तक लिहिले आहे; त्यावरून आजवरच्या परिषदेच्या वाटचालीची कल्पना येते.

ग्रंथकार संमेलने सुरुवातीला घेणाऱ्या या संस्थेचे कार्यालय काही वर्षे मुंबईत होते. १९३५ मध्ये औंध संस्थानचे पंतप्रतिनिधी यांनी आपल्या पुण्यातील पंताचा गोट या भागातील एक भूखंड महाराष्ट्र साहित्य परिषदेला ९९९ वर्षांच्या कराराने दिला आणि पुण्यात साहित्य परिषदेचे कार्यालय आले. त्यावर्षी इंदूरला झालेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांना कृतज्ञतापूर्वक देण्यात आले. माधवराव पटवर्धन (१९३६), स्वातंत्र्यवीर सावरकर (१९३८), म. म. दत्तो वामन पोतदार (१९३९), ना. सी. फडके (१९४०), वि. स. खांडेकर (१९४१), आचार्य अत्रे (१९४२), श्री. म. माटे (१९४३), मामा वरेरकर (१९४४), ग. त्र्यं. माडखोलकर (१९४५), प्रा. न. र. फाटक (१९४७), आचार्य शं. द. जावडेकर (१९४९), राजकवी य. दि. पेंढरकर (१९५०)... अशा त्या वेळच्या अग्रगण्य साहित्यकारांनी संमेलनांची अध्यक्षपदे भूषविली आणि मराठी साहित्य क्षेत्रातील सुवर्णयुग गाजवले. यापैकी बहुतेक अध्यक्ष हे आपल्या योगदानामुळे आम जनतेपर्यंत पोचलेले होते. साहित्य परिषदेतर्फे ही अध्यक्षांची निवड होत असे; पुढे जेथे संमेलन असेल तेथील स्वागत समितीलाही निवडीत सहभाग मिळू लागला. १९६५ साली मराठी साहित्य महामंडळाची स्थापना होऊन अ. भा. साहित्य संमेलनाचे आयोजन महामंडळातर्फे होऊ लागले.

१९३५ साली साहित्य परिषदेची स्वतंत्र वास्तू उभी राहिल्यानंतर साहित्यविषयक विविध उपक्रमांना खऱ्या अर्थाने चालना मिळाली; त्या आधी संस्थानिक - सरदारांच्या आश्रयावर संमेलने भरत; ती परिस्थिती पालटली. पुढे राजाश्रय मिळत राहिला पण तो वेगळ्या स्वरूपात. स्वागताध्यक्ष व संयोजक यात स्थानिक नेत्यांचा वरचष्मा राहिला. निरलस संयोजनाची काही आदर्श उदाहरणेही त्यात दिसून आली. वर्धा येथील १९६९च्या संमेलनासाठी स्वागताध्यक्ष रामकृष्ण बजाज यांनी आपले शेत विकून साठ हजार रुपये उभे केले. संमेलनातील राजकीय नेत्यांच्या सहभागाविरुद्ध कधीकधी आवाज उमटत राहिला. परंतु आता महाराष्ट्र शासनाने संमेलनाला २५ लाखांच्या अनुदानाची अर्थसंकल्पातच तरतूद करून टाकल्याने राजाश्रयालाही अधिकृत स्वरूप लाभले आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या आजवरच्या वाटचालीत अनेक पदाधिकारी आले आणि गेले. काही व्यक्तींनी चांगले काम करून संस्थेच्या प्रतिष्ठेत मोठी भर टाकली. श्री. म. माटे यांनी इमारतीच्या उभारणीसाठी कष्ट घेतले. पुढे काकासाहेब

गाडगीळ यांनी इमारतीसाठी मोठा निधी मिळवून तिचे विस्तारीकरण केले. अतिथीगृहाची सोय झाली. ना. शरद पवार यांनी पटवर्धन सभागृहाच्या नूतनीकरणासाठी एक लाख रुपये दिले; शिवाय साहित्य संस्थांना दरवर्षी खर्चाची तोंडमिळवणी करणे सोपे जावे म्हणून एकेक लाखाचे अनुदान सुरू केले. वाढत्या महागाईतही त्यामुळे साहित्य परिषदेचे अनेकविध उपक्रम जारी ठेवता आले.

शताब्दीच्या निमित्ताने संस्थेने खूप काही संकल्प सोडले आहेत. आहे त्या जागेवरच सहा मजली मोठी इमारत बांधण्याचा बेत आहे. खरे तर सध्याची ही जागा तशी विस्ताराला फारशी सोयीची नाही. तसेच सध्याच्या जागेचा उपयोग लीझ डीड अनुसार कमर्शियल कारणासाठी करता येण्यासारखा नाही. त्यामुळे सहासात कोटी रुपये गुंतवूनही नव्या इमारतीतून काही उत्पन्नाची व्यवस्था होऊ शकणार नाही. हे लक्षात घेऊन या चिंचोळ्या जागेवरच एवढा खर्च करण्यापेक्षा पुणे परिसरात जवळपास मोठी जागा मिळवून तेथे भव्य इमारत बांधण्याची योजना आखायला हवी. वेळोवेळी अशा योजनांचे प्रस्तावही परिषदेकडे आले होते. १९७०मध्ये ग. ल. ठोकळ यांनी त्या दृष्टीने काही प्रयत्नही चालवले होते. परंतु पदाधिकाऱ्यांतील मतभिन्नतेमुळे अशा प्रयत्नांना यश लाभले नाही. शताब्दीनिमित्ताने एखादा चांगला भूखंड मिळवून सर्व सोयींनी युक्त अशी इमारत उभी करून, उत्पन्नाची नवी साधने निर्माण करून विविध उपक्रमांसाठी निधीची व्यवस्था करणे इष्ट ठरले असते. त्यासाठी योग्य ती संपर्कक्षमता असणाऱ्या व्यक्तींची मदत घेतली असती तर ते अवघडही नव्हते. तथापि ते होण्यासाठी आणखी काही काळ जावा लागेल असे दिसते. काळानुसार संस्थांमध्येही परिवर्तने होणे आवश्यक असते. नाहीतर प्रगतीचे प्रवाह अवरुद्ध होतात.

शताब्दीच्या निमित्ताने परिषदेला शुभेच्छा. रसिक साहित्यप्रेमींच्या वाढत्या अपेक्षांना न्याय देता येईल अशा प्रकारे परिषदेची पुढची वाटचाल चैतन्यपूर्ण आणि उपक्रमशील होत राहो ही अपेक्षा.

- संपादक


**लवकरच येत आहे.....**

**चला! उठा! कामाला लागा!**

**स्वाती- सतीश लोढा**

**अनुवाद अंजनी नरवणे**

**१२०रु.**


स्वत:ला टप्याटप्याने ओळखत, स्वत:तले दोष बाजूला करत, गुणांना उजळवत यश कसे मिळवायचे याचे प्रात्यक्षिकांसह सहज सोपे मार्गदर्शन







**लवकरच आपल्या भेटीला येत आहेत .....**
**वेगवेगळ्या विषयांवरील दर्जेदार पुस्तके.....**




**अमर्याद अवकाशातील अगणित तारकांबद्दल सर्वकाही..**

**तारकांच्या विश्वात**

पराग महाजनी

**आशा बगे यांच्या आशयघन कथा**









**प्रतिद्वंद्वी**

**पाऊलवाटेवरले गाव**




**स्वप्नांचे विश्व उलगडणारे अनोखे लेखन**

**चित्तचित्रे**

**स्वप्नी जे देखिले**

संपादन
अरुण शेवते

# साहित्यवार्ता

## * पेंग्विनचा मराठी प्रकाशन क्षेत्रात प्रवेश

मॅकमिलन आणि ओरिएंट-लाँगमन या प्रकाशन संस्थांच्यापाठोपाठ आता पेंग्विन या जगद्विख्यात संस्थेनेही मराठीत पुस्तके काढण्याचे जाहीर केले आहे.

पेंग्विन ही जगद्विख्यात प्रकाशन संस्था असल्यामुळे तिच्याकडे असणारा पैसा, मनुष्यबळ आणि तिचे देशभर तसे जगभर पसरलेले जाळे पाहता मराठी लेखकप्रकाशकांनाही नवे परिमाण लाभेल.

मराठीत यापूर्वी 'जेजुरी' तसेच 'सात सक्कं त्रेचाळीस' लिहिणारे इंग्रजी कवी अरुण कोलटकर आणि कादंबरीकार किरण नगरकर यांच्यासारख्या साहित्यिकांचे इंग्रजी लेखनही इंग्रजीत प्रसिद्ध झाले आहे. त्यांचे मराठी साहित्य मराठीत प्रकाशित करण्याची संधी आता पेंग्विनला मिळेल, असे मत इंग्रजीतल्या मान्यवर लेखकांनी व्यक्त केले आहे. मनोहर माळगावकर ते दिलीप चित्रे यांच्यापर्यंत अनेक लेखक इंग्रजीमध्ये विपुल लिखाण करत असून त्यांचे अनुवाद देशी तसेच परदेशी भाषांमध्येही झाले आहेत.

दरम्यान, 'पॅरॅडाईज ॲण्ड आदर स्टोरीज' (खुशवंतसिंग यांच्या कथांचा हिंदी अनुवाद) 'जन्नत और अन्य कथाएँ' या नावाने पेंग्विन तर्फे प्रकाशित होत आहे. याशिवाय अनिता नायरच्या पुस्तकाचा अनुवाद 'लेडिज कुपे' आणि नमिता गोखले यांच्या 'शकुंतला' या पुस्तकाचा त्याच नावाचा हिंदी अनुवादही प्रसिद्ध होत आहे.

जागतिकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्थेमुळेच पेंग्विन भारतातील भाषिक प्रकाशन व्यवसायात प्रवेश करणार आहे. मराठी आणि मल्याळम पुस्तकांच्या प्रकाशनास पेंग्विनतर्फे या वर्षातच आरंभ होत आहे, असे पेंग्विन इंडियाचे अध्यक्ष थॉमस अब्राहम यांनी जाहीर केले.

आत्तापर्यंत कोणताही प्रादेशिक भाषिक प्रकाशक हा देशपातळीवर गाजलेला नाही. म्हणूनच या बाजारपेठेतील पुस्तकांच्या किंमती इंग्रजी पुस्तकांपेक्षा कमी ठेवण्यात येतील, असे अब्राहम यांनी सांगितले.

हिंदीप्रमाणेच मराठी आणि मल्याळम सारख्या भारतीय भाषांमध्ये प्रकाशन व्यवसायास मोठा वाव आहे. स्थानिक लेखकांबरोबरच पेंग्विनच्या इंग्रजी पुस्तकांची भाषांतरेही प्रसिद्ध करणे शक्य आहे. अरुंधती राय यांच्या 'ॲन ऑर्डिनरी पर्सन्स'



तसेच 'गाइड टू एम्पायर' आणि शोभा डे यांच्या 'स्पाऊस' या पुस्तकांचा त्यात समावेश आहे.

## * 'जीवनावर प्रेम असल्याशिवाय सर्कस समजू शकणार नाही'

''जीवनावर प्रेम असल्याशिवाय सर्कस समजू शकणार नाही. सर्कस हा अभ्यासाचा विषय असून, आज सर्कस पाहण्याची दृष्टी राहिली नाही. 'सर्कस' या विषयावर पुस्तक लिहिण्यासाठी श्यामला शिरोळकर यांनी अभ्यासपूर्ण काम केले आहे. दहा प्रबंधांचे काम त्यांनी एका पुस्तकाद्वारे साध्य केले आहे,'' असे प्रशंसोद्गार शिवाजीराव भोसले यांनी श्यामला शिरोळकर यांच्या 'सर्कस सर्कस' या पुस्तकाचे प्रकाशन करताना काढले. श्री ऐश्वर्यगणेश प्रकाशनाचे हे पहिलेच पुस्तक आहे. डॉ. प. वि. वर्तक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रा. भोसले पुढे म्हणाले, ''जगात विविध रूपांत सर्कस अस्तित्वात आहे; परंतु तिच्याकडे बघण्याची दृष्टी बदललेली आहे. सर्कशीचे विश्‍व जाणून घेतल्यास जीवनात बऱ्याच गोष्टी सहज घडू शकतात.'' डॉ. वर्तक म्हणाले, ''वेदांपासून सर्कशीविषयीचा आलेख पुस्तकात घेण्यासोबतच देश-विदेशातील सर्कशींचा इतिहास व सर्कशींची सखोल माहितीही आहे.''

## * विज्ञानाला अध्यात्माची जोड हवी : डॉ. भटकर

''स्वामी विवेकानंद यांच्या स्वप्नातील उन्नत माणूस आणि महान भारत निर्माण करण्यासाठी विज्ञानाला अध्यात्माची जोड मिळायला हवी,'' असे मत संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांनी व्यक्त केले.

लायन्स संघटनेच्या लायन्स ३२३ मल्टिपलचे बहुप्रांतीय अधिवेशन नुकतेच पुणे येथे झाले. त्या वेळी डॉ. भटकर बोलत होते. अभिनेते व खासदार गोविंदा, शत्रुघ्न सिन्हा, मिस वर्ल्ड डायना हेडन, लायन्सचे फर्स्ट व्हाइस प्रेसिडेंट अशोक मेहता, द्वारका जालन आदी या अधिवेशनास उपस्थित होते.

डॉ. भटकर म्हणाले, ''विज्ञान आणि अध्यात्म या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मनुष्याचा सर्वांगीण विकास आणि उन्नती हेच दोघांना अभिप्रेत आहे.''

शत्रुघ्न सिन्हा म्हणाले, ''स्वातंत्र्यानंतर देशाची ज्ञानविज्ञानात प्रगती झाली आहे. तरीही दारिद्र्य, रोगराई, विषमता मोठ्या प्रमाणात दिसते. धर्मावर आधारित मंदिरमशीद उभारण्यासाठी संघर्ष करण्यापेक्षा 'मानव मंदिर' उभारणे ही काळाची गरज आहे.''

## * तुकारामांच्या गाथेचे वैश्विक परिमाण

साध्या आणि सोप्या शब्दरचनेतून मोठे तत्त्वज्ञान सांगणारे संत तुकाराम आणि त्यांचे अभंग हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा असून हा ठेवा गेली अनेक शतके अजरामर राहिला आहे. तुकोबारायांची ही अभंगगाथा आणि साहित्य आता फक्त महाराष्ट्रापुरतेच मर्यादित राहिले नसून जगाच्या पाठीवरील सुमारे शंभरहून

अधिक देशांमध्ये लोकप्रिय ठरले आहे. विशेष म्हणजे तुकारामांची ही गाथा मराठी भाषेखेरीज हिंदी, बंगाली, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन, स्पॅनिश आदी भाषांमध्ये अनुवादित झाली आहे.

दिलीप धोंडे आणि सहकाऱ्यांनी वेबसाईटची निर्मिती केली आहे. दिलीप पुरुषोत्तम चित्रे आणि डॉ. सदानंद मोरे यांचे मार्गदर्शन लाभले असून या वेबसाईटला दररोज सुमारे तीनशे लोक भेट देत आहेत.

पुणे येथील जमीर पीर मोहमंद यांनी वेबसाईटला भेट दिल्यानंतर, मी मुस्लीम असून ही मला ही साईट खूप भावली, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. तर न्यूयॉर्क येथील लिंडा यांनी तुकाराम यांच्या काव्याचा जागतिक विद्यापीठ स्तरावर अभ्यास व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. मेक्सिको येथील कार्लस मार्टन यांनी 'आय लव्ह तुकाराम' अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या.

अमेरिकेतील विविध शैक्षणिक संस्थांमधून या साईटला भेट देणाऱ्यांची संख्या जास्त आहे. तसेच कॅनडा, जर्मनी, ग्रेट ब्रिटन, रशिया, युक्रेन, लेबॅनॉन आदी देशांमधूनही तुकाराम लोकप्रिय ठरले आहेत.

पुढील वर्षी तुकाराम जयंतीदिनी ही गाथा सिंधी भाषेत, २००७ मध्ये तामीळ आणि २००८ या वर्षी संस्कृत भाषेत अनुवादित करण्यात येणार आहे.

### * देशभक्ती रुजविण्यासाठी सावरकरांचे साहित्य आवश्यक

''नव्या पिढीमध्ये देशभक्ती व निर्भयता रुजवायची असेल तर सावरकरांच्या साहित्याशिवाय पर्याय नाही. सावरकरांच्या साहित्यात प्रज्ञा आणि प्रतिभेचा अनोखा संगम आहे. कालबाह्य रूढींवर प्रहार, विवेकनिष्ठा व प्रयत्नवादाचा पुरस्कार हे त्यांच्या साहित्याचे वैशिष्ट्य होय,'' असे प्रतिपादन डॉ. अशोक मोडक यांनी वसंत व्याख्यानमालेत केले. ''सावरकर हे स्वातंत्र्यसेनानी तर होतेच; परंतु ते उत्कृष्ट व बहुआयामी साहित्यिकही होते. त्यांचे वैज्ञानिक, वैचारिक, देशभक्तिपर, सामाजिक साहित्य आठ खंडांत आहे. ध्येयवादिता हा सावरकरांच्या साहित्याचा प्राण आहे. देशासमोर कायदा, सुव्यवस्था, भ्रष्टाचार, अंधश्रद्धा यासारखी अनेक संकटे उभी ठाकली असताना त्याला तोंड देण्यासाठी सावरकरांचे साहित्य बहुमोल ठरेल.''

### * आत्मविश्वासाला प्रयत्नांची जोड मिळाली तरच यश

आत्मविश्वासाला प्रयत्नांची जोड मिळाली, तरच यशाचा मार्ग साधता येतो. या मार्गावर जाणाऱ्या युवक पिढीच्या पंखांना आकांक्षांचे बळ देण्याचे सामर्थ्य समाजातील प्रज्ञावंतांमध्ये असते, असे मत टिळक महाराष्ट्र अभिमत विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. हीरा अद्यंताया यांनी व्यक्त केले.

विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या महाराष्ट्रातील प्रज्ञावंतांच्या जीवनकार्यावर आधारित 'प्रज्ञावंतांची दैनंदिनी' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. अद्यंताया



यांच्या हस्ते झाले.

अभिनेत्री लालन सारंग प्रमुख पाहुण्या होत्या. ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ डॉ. सत्यरंजन साठे अध्यक्षस्थानी होते. डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमात लेखक अनिल अवचट, अर्थतज्ज्ञ गिरीश वासुदेव, गीतकार जगदीश खेबुडकर, 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित, उद्योजक गजाननराव पेंढारकर, बुद्धिबळपटू अभिजित कुंटे आदींचा सत्कार करण्यात आला.

### * गदिमांचे स्मारक पुण्यात होणार

'गीतरामायण'कार ग. दि. माडगूळकर अर्थात 'गदिमा' यांचे पुण्यात स्मारक करण्याची जबाबदारी राज्य सरकार टाळू इच्छित नाही, असे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी पुण्यात स्पष्ट केले.

गीतरामायणाच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्याच्या समारोप कार्यक्रमात ते म्हणाले, रामायण नव्या पिढीपर्यंत नेण्याचे मोठे काम गदिमांनी केल्यामुळेच महामहोपाध्याय द. वा. पोतदार यांनी 'आधुनिक वाल्मिकी' असा त्यांचा सार्थ उल्लेख केला. गीतरामायण हे अदृश्य शक्तीने माझ्याकडून लिहून घेतले असे ते सांगत. मोठे कार्य करूनही त्यांनी त्याचे श्रेय घेतले नाही. त्यांची ही भावना त्यांचे मोठेपण वाढवते, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, त्यांच्या स्मारकाचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यांचे स्मारक व्हावे अशी अनेक ठिकाणची मागणी आहे. ते कोठे करावे असा प्रश्न सरकारला पडावा, हेही त्यांचे मोठेपण आहे. पुण्यात नसेल तर ते लोकांपर्यंत पोहोचणार नाही याची सरकारला जाणीव आहेच. राज्य सरकार त्याबाबतची आपली जाबाबदारी टाळणार नाही.

### * वृत्तपत्रांना स्पर्धेचा धोका नाही

वाचकांमधल्या जाणीवा जागृत करण्यासाठी आणि त्यांच्याशी असणारी बांधिलकी जपण्यासाठी वृत्तपत्रांनी काम करावे, म्हणजे स्पर्धेच्या युगात त्यांना टिकणे अवघड जाणार नाही, असे मत 'लोकसत्ता'चे सहायक संपादक अरविंद व्यं. गोखले यांनी मांडले.

मित्रमंडळ ज्येष्ठ नागरिक संघातर्फे 'आजच्या चॅनल युगात वृत्तपत्रांचे अस्तित्व' या विषयावर व्याख्यान झाले.

स्वातंत्र्यपूर्व काळात आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या काळात लोकांना वृत्तपत्रविषयी असणारे कुतूहल आजकाल वाटत नाही. वृत्तपत्र आणि दृक्‌श्राव्य माध्यमांमध्ये लोकांना 'एक्स्पोज' करण्याची स्पर्धा सुरू झाली आहे आणि अशा गोष्टींबद्दल तसेच वृत्तपत्रातल्या चुकांबद्दल जाब विचारणारे वाचकही आजकाल दिसत नाहीत, अशी खंत गोखले यांनी व्यक्त केली.

दृक्‌श्राव्य माध्यमांच्या युगात वृत्तपत्रांना टिकायचे असेल तर त्यांना आपली परिणामकारकता, कार्यक्षमता आणि अर्थव्यवस्था याकडे लक्ष द्यायला हवे. सध्या

ही दोन्ही माध्यमे परस्परपूरक भूमिका पार पाडत आहेत, असेही ते म्हणाले.

दृक्‌श्राव्य माध्यमातील 'ब्रेकिंग न्यूज' हा प्रेक्षक वर्ग वाढविण्यासाठीचा उपक्रम आहे. असे असले तरी या माध्यमातील वृत्तवाहिन्या भाषेशी ठेवत असलेला प्रामाणिकपणा स्तुत्य आहे. मराठी वृत्तपत्रे हिंदी आणि इंग्रजी भाषेकडे वाहवत चालली आहेत, असे मतही त्यांनी मांडले.

### * गुजराती साहित्यक्षेत्रात मराठी माणसाची कमाल!

गुजरात राज्य संगीत नाटक अकादमी, गांधीनगरद्वारा आयोजित एकांकी व त्रिअंकी नाट्य स्पर्धाची अंतिम फेरी अनुक्रमे सावरकुंडला व राजकोट येथील रंगमंदिरात पार पडली. श्री. शैलेंद्र बी. वडनेर यांनी लिहिलेल्या 'एक झरणानी बात' ही एकांकिका व 'बात जाणे एम बनी' या तीन अंकी नाटकास गुजराती मौलिक नाट्य लेखनाचे प्रथम पारितोषिक जाहीर झाले. एकांकिकेस एकूण सहा बक्षिसे मिळाल्याने ती सर्वप्रथम ठरली. नाटकास द्वितीय क्रमांक मिळाला.

श्री. शैलेंद्र बी. वडनेर यांच्या नाट्यलेखनाने गुजराती साहित्यात मोलाची भर घातली आहे. अन्य एका स्पर्धेतही त्यांना उत्तम स्क्रिप्टचे बक्षीस मिळाल्याने २००४-०५ मध्ये त्यांनी हॅटट्रिक केली आहे.

### * कवितेची आनंदयात्रा...

अंबाजोगाई पीपल्स को-ऑप. बँक लि. आणि साक्षात या वाङ्मयीन त्रैमासिकाच्या वतीने 'विसाव्या शतकाची मराठी कविता : एक आनंदयात्रा' हा कार्यक्रम औरंगाबादेत तापडिया नाट्यमंदिरात सादर केला गेला. या कार्यक्रमात श्री. ना. धो. महानोर यांनी जळगावचे महेश जोशी, शंभू पाटील, विजय बाविस्कर, शिरीष बर्वे, सीमा जोशी, संगीता म्हसकर, अर्चना खासनीस आणि प्रतिमा जगताप यांना सोबत घेऊन निवडक मराठी कवितांचे वाचन केले.

श्री. महेश जोशी यांनी सुरुवातीला 'नव्या मनुतील नव्या दमाचा शूर शिपाई आहे' ही केशवसुतांची कविता सादर केली. महानोरांच्या 'धो धो कवितावाचनात' रसिक चिंब भिजून गेले. 'मधू मागसी माझ्या सख्या परि' (भा. रा. तांबे), 'धरित्रीले दंडवत' (बहिणाबाई), 'कृतज्ञता' (गिरीश), 'घाल घाल पिंगा वाऱ्या माझ्या परसात' (कृ. ब. निकुंब), 'लगबग चाले नार' (वा. रा. कांत), 'कणा', (कुसुमाग्रज), 'नको नको रे पावसा' (इंदिरा) आदी कविता सादर करण्यात आल्या.

महानोर म्हणाले, 'पंचवीस तासांचा कार्यक्रम केला तरी अपूर्णच राहील एवढी मराठी कविता समृद्ध आहे. आपल्याला फक्त बालकवी माहीत असले तरी त्यांच्याबरोबर उत्तम निसर्ग कविता लिहिणारे पंचवीस कवी होऊन गेलेले आहेत. ही कवितेची आनंदयात्रा आहे. ज्यांनी कवितेचा धसका घेतलेला आहे त्यांच्यासाठी माझा हा कार्यक्रम आहे! कविता कळत नाही अशी अनेक जणांची तक्रार असते. माझं असं म्हणणं आहे की माझ्यासारख्या खेड्यातल्या माणसाला कविता कळते तर इतरांना का कळू नये?'



### * फ्रेंच व्यक्तीकडे २५ हजार हिंदी गाण्यांचे हक्क

१९६९ पासून भारतात राहात असलेल्या अकिल फोर्लर या फ्रेंच गृहस्थाकडे २५,२०० गाण्यांचे तसेच अनेक शास्त्रीय संगीत रचनांचे व पॉप गाण्यांचे हक्क आहेत. एवढेच नव्हे तर त्यांच्याकडे सत्यजित रे यांचा एकमेव हिंदी चित्रपट 'शतरंज के खिलाडी', अमोल पालेकर यांचा ऑल टाइम हिट 'रजनीगंधा' व प्रसिद्ध शास्त्रीय संगीताच्या गायिका शुभा मुदगल यांच्या काही गाण्यांचे हक्क आहेत.

फोर्लर यांच्याकडे एवढ्या गाण्यांचे हक्क असल्याने बीएमजी या प्रसिद्ध म्युझिक कंपनीने त्यांच्याशी भागीदारी केली आहे. काही महिन्यांपूर्वी १२ कोटी रु.च्या भांडवलावर फोर्लर यांनी 'डीप इमोशन्स' ही कंपनी स्थापन केली आणि पुढच्या पाच वर्षातील जुन्या हिंदी गाण्यांचे त्यांनी हक्क विकत घेतले. सध्या डीप इमोशन्स व बीएमजी म्युझिक कंपनी अनेक संगीतकारांना व गीतकारांना आपल्या कंपनीला हक्क देण्याबाबत सांगत आहेत. अनेक जणांनी त्यांच्याशी करारही केला आहे. फोर्लर भारतीय चित्रपटातील कॉपीरायटिंग कायद्याचे उल्लंघन व लोकांना या कायद्याविषयी असलेल्या अज्ञानाबाबत बरेच काही सांगतात. गेल्या दोन वर्षांत इस्त्रायलमध्ये सुमारे दोन हजार हिंदी चित्रपटांचे प्रसारण करण्यात आले. अनेक चित्रपट केबल वाहिन्यांवरून दाखविण्यात आले. हजारो गाणी रेडिओवरून प्रसारित करण्यात आली. यामुळे हिंदी चित्रपटसृष्टीचे करोडो रुपयांचे नुकसान झाले. कॉपीराइट कायद्याचे निर्मात्यांना ज्ञान असते तर एवढी रक्कम गीतकारांना, संगीतकारांना मिळाली असती, असे फोर्लर सांगतात. १९९५ मध्ये या व्यवसायात आल्यानंतर, अनेक संगीतकारांना, कॅसेट कंपन्यांना अशा कायद्याचे पाठबळ असते, याची कल्पना नसल्याचा धक्कादायक अनुभव फोर्लर सांगतात. आपल्या पैशासाठी कसे लढायचे हे त्यांना माहीत नसते. त्यांच्याकडे कोर्टबाजी करण्यासाठी वेळ नसतो. एके दिवशी प्रसिद्ध गायिका शुभा मुदगल माझ्याकडे आल्या. त्यांनी मीरा नायर यांच्या 'कामसूत्र' या चित्रपटात गाणे गायले होते. त्यांना या गाण्यासाठी ३० हजार रु. देण्यात आले होते. पण या गाण्याचे हक्क संगीतकार मायकेल दान्ना यांच्याकडे होते. अशा वेळी आपण न्यायालयात जाऊन मुदगल यांना त्यांच्या हक्काचे साडेतीन लाख रु. मिळवून दिले. आता मुदगल ज्या चित्रपटासाठी गाणे म्हणतात, त्या गाण्याच्या रॉयल्टीचे सर्व पैसे त्यांना मिळतात. फोर्लर यांना सध्या त्यांनी हक्क मिळविलेल्या गाण्यांचे ५० टक्के पैसे मिळतात. फोर्लर यांच्याकडे सध्या जगभरातील वीस लाख गाण्यांचे हक्क आहेत.

## * शेक्सपियरचे पोर्ट्रेट बनावट!

जगद्‌विख्यात असलेले शेक्सपियरचे 'फ्लॉवर पोर्ट्रेट' बनावट असल्याचा निर्वाळा ब्रिटनच्या नॅशनल पोर्ट्रेट गॅलरीच्या तज्ज्ञांनी दिला आहे.

शेक्सपियरच्या 'फ्लॉवर पोर्ट्रेट' या व्यक्तिचित्रावर जी तारीख नमूद करण्यात आली आहे, त्याहून म्हणजेच १६०९ सालानंतर बऱ्याच कालावधीनंतर हे व्यक्तिचित्र चितारण्यात आले असावे. या व्यक्तिचित्रात मुक्त स्वरूपात वापरण्यात आलेला क्रोम पिवळा रंग हा सुमारे १८१४च्या काळातील असल्याचे नॅशनल पोर्ट्रेट गॅलरीच्या कला अभ्यासक तरन्या कूपर यांनी स्पष्ट केले. त्यामुळे हे व्यक्तिचित्र १८१८ ते १८४० या काळातील आहे का, यासंबंधी अभ्यास सुरू आहे. शेक्सपियरच्या नाटकांना सुगीचे दिवस होते, तेव्हाचाच हा कालखंड आहे, असेही त्या म्हणाल्या.

एका विशिष्ट दिशेने बघणाऱ्या आणि मोठी पांढऱ्या रंगाची कॉलर असलेला गणवेष धारण केलेल्या शेक्सपियरचे हे चित्र अत्यंत लोकप्रिय आहे. शेक्सपियरच्या पुस्तकांच्या मुखपृष्ठावरही हीच छबी बघायला मिळते. या चित्राच्या पडताळणीसाठी क्ष किरण, अतिनील किरणे, मायक्रोफोटोग्राफी आणि रंगांचा छाननी अशा अनेक तपासण्या केल्या.

## * जेष्ठ चित्रकार बाळ ठाकूर - नाबाद ७५

तांत्रिक चौकटी ओलांडणाऱ्या दृश्यकला जाणिवांनिशी मराठी साहित्याला समकालीन रूप देणारे ज्येष्ठ चित्रकार बाळ ठाकूर यांनी पंच्याहत्तरी पूर्ण केली. ठाकुरांच्या प्रसिद्धीपराङ्‌मुख स्वभावानुसार कोणताही सोहळा यानिमित्त झाला नाही.

हिंदुस्तान थॉम्पसनपासून उल्कापर्यंत चार नामवंत जाहिरात संस्थांमध्ये नोकरी करीत असतानाच त्यांनी छपाई व टायपोग्राफीचे प्रयोग केले, तर अशोक शहाणे आणि त्यांच्या दोस्तांसह 'असो'च्या अंकांना नवे दृश्यरूप मिळवून दिले.

'रहस्यरंजन' या आता विस्मृतीत गेलेल्या मासिकापासून ठाकूर मराठी साहित्यक्षेत्रात होते. 'गोतावळा' (आनंद यादव) 'बिअरची सहा कॅन्स' (नरेश), रवीन्द्रनाथ : तीन व्याख्याने (पु. ल. देशपांडे) धर्म आणि लोकसाहित्य (दुर्गा भागवत) ही त्यांची मुखपृष्ठे मराठी पुस्तकांच्या निर्मितीमूल्यांना निराळे वळण देणारी ठरली. 'बिअरची सहा कॅन्स'साठी पॅकेजिंग मटीरियलचाच वापर त्यांनी मुखपृष्ठात केला.

## * यशस्वी होण्यासाठी पालकांचे संस्कारच महत्त्वाचे

आई-वडिलांनी केलेले संस्कार कधीच विसरू नका. हे संस्कारच जीवनात उच्च शिखरावर पोहोचण्यास मदत करतील, अशा शब्दांत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले.



'आविष्कार प्रकाशन'तर्फे झालेल्या उत्तरा मोने लिखित 'कृतार्थ' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादक भारतकुमार राऊत, ज्येष्ठ पत्रकार संजीव लाटकर, आल्हाद गोडबोले, संजय राऊत, आदी मान्यवर उपस्थित होते.

चित्रपट, संगीत, नाटक, साहित्य, संगीत, खेळ, पत्रकारिता, उद्योग, जाहिरात आदी क्षेत्रांतील यशस्वी व्यक्तींच्या आई-वडिलांनी सांगितलेल्या आठवणींवर 'कृतार्थ' हे पुस्तक आधारित आहे. गायिका पद्‌मजा फेणाणी-जोगळेकर यांनी, 'हे पुस्तक नव्या पिढीत चेतना जागवण्याचे काम करेल. पाश्चिमात्त्यांचे अंधानुकरण करताना भरकटलेल्या नव्या पिढीला दीपस्तंभ होऊन मार्गही दाखवेल,' असा विश्वास व्यक्त केला.

## * 'शिक्षणक्षेत्राने ज्ञानाचा प्रसार करावा'

भारताला जर जागतिक पातळीवर नेतृत्व करायचे असेल तर शैक्षणिक क्षेत्राने ज्ञानाचा प्रसार करावा, असे मत राजीव गांधी विज्ञान आयोगाचे अध्यक्ष डॉ. वसंत गोवारीकर यांनी व्यक्त केले.

टाइम्स एज्युकेशनतर्फे आयोजित कार्यक्रमात बोलताना ते म्हणाले की, तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे मानवी जीवनशैलीमध्ये बदल झाला आहे. आजच्या घटकेला विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा विचार करताना बदलत जाणाऱ्या तंत्रज्ञानाचा विचार करण्याची आवश्यकता आहे. अवकाश संशोधन क्षेत्रात अग्रेसर असणारे भारत हे सहावे राष्ट्र आहे. शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे जागतिकीकरणामध्ये उच्चशिक्षणाचा दर्जा वाढत आहे. सरकारने १०० टक्के साक्षरतेचे लक्ष्य ठेवण्याची आवश्यकता आहे.

## * पुस्तकांच्या दुनियेतही पवारांची आघाडी!

वाचन संस्कृती लोप पावत चालल्याची कितीही ओरड होत असली तरी मराठी पुस्तके धडाधड खपत असलेली पहायला मिळत आहेत. 'शुभम् साहित्य' यांनी आयोजित केलेल्या प्रदर्शनात चाळीस दिवसांमध्ये सुमारे पाच लाखांची पुस्तके विकली गेली. स्वामी प्रकाशनने प्रकाशित केलेल्या रविकिरण साने यांनी लिहिलेल्या 'दूरदृष्टीचा जाणता नेता- शरद पवार' या पुस्तकाला सर्वाधिक मागणी होती. या पुस्तकाच्या दीडशेच्यावर प्रती खपल्या. त्याखालोखाल धिरूभाई अंबानी यांच्या चरित्राला मागणी होती. गिरीश दाबके यांनी त्याचा मराठी अनुवाद केला आहे. याशिवाय विठ्ठल कामत यांचे 'इडली आर्किड आणि मी', डॉ. श्रीनिवास ठाणेकर यांचे 'हे तो श्रींची इच्छा', डॉ. दातार यांचे 'दोन तात्या' या चरित्रात्मक पुस्तकांना वाचकांकडून पसंती मिळत होती.

'शुभम् साहित्य' चे पुस्तक प्रदर्शन यंदाही अत्रे सभागृहात १५ मार्चपासून तीन मे पर्यंत सुरू होते. वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळाला असे 'शुभम'चे राजू ओंबासे यांनी सांगितले.

प्रदर्शनात सुमारे ५० हजार पुस्तके होती. यावेळी भविष्य, फेंगशुई, चरित्रात्मक, प्रवासवर्णन आणि विविध अनुवादित पुस्तकांना चांगली मागणी असल्याचे त्यांनी सांगितले.

सुट्टीमुळे लहान मुलांच्या पुस्तकांनाही चांगली मागणी होती. पंचतंत्र, हितोपदेश, अरेबियन नाईटस्, फास्टर फेणे, शेरलॉक होम्स या पुस्तकांना मागणी होती. विज्ञानावर आधारित पुस्तकांची चांगली विक्री झाली.

### * भारतीय भाषांचे फॉन्ट सक्तीचे

कम्प्युटरची निर्मिती करताना भारतातील कंपन्यांना सर्व प्रमुख भारतीय भाषांचे फॉन्ट लोड करणे सक्तीचे करण्याचा विचार सरकार करीत आहे, अशी माहिती केंद्रीय आयटी मंत्री दयानिधी मारन यांनी दिली.

केंद्र सरकार भारतीय भाषांच्या फॉन्टचे मोफत वितरण करीत आहे. ते पूर्ण झाल्यानंतर आयबीएम, एचसीएल सारख्या कंपन्यांवर फॉन्ट वापरणे सक्तीचे करण्यात येईल. भारतात फक्त पाच टक्के लोकच इंग्रजी बोलतात. त्यामुळे कम्प्युटरचे फायदे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी हे पाऊल उचलण्यात येतेय', असे मारन यांनी स्पष्ट केले. एकूण बावीस भारतीय भाषांचे फॉन्ट वितरित करायची ही योजना आहे. त्यापैकी तामिळचे फॉन्ट गेल्याच महिन्यात आणण्यात आले. तर हिंदीचे फॉन्ट पुढच्या महिन्यात येतील.

### * कालसुसंगत गुरुकुल पद्धतीचा विचार करावा

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या साहाय्याने केलेली प्रगती डोळे दिपविणारी असली, तरी ती झपाट्याने कालबाह्य ठरते. मानवी मूल्ये मात्र कायम राहतात. शिक्षण पद्धतीमधून ही मूल्ये रुजविण्यासाठी कालसुसंगत गुरुकुल पद्धतीचा विचार करावा, असे आवाहन ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांनी केले.

साधना सेंटर फॉर मॅनेजमेंट ॲण्ड लीडरशिप डेव्हलपमेंट या संस्थेने आयोजित केलेल्या परिषदेत ते बोलत होते.

इंग्रज भारतामधून गेले तरी मेकॉलेच्या शिक्षणपद्धतीचा पगडा आपल्यावरून जात नाही, अशी टीका करून डॉ. भटकर म्हणाले की, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी यांनी भारतीय शिक्षणव्यवस्था कशी असावी, याचे विस्तृत विवेचन केले आहे. परंतु, त्याकडे आपण डोळेझाक केली.

### * गुलजार यांचा मराठीचा अभ्यास

सध्या गुलजार मराठी भाषा सुधारण्यासाठी प्रचंड मेहनत घेत आहेत. कुसुमाग्रजांच्या कवितांचे भाषांतर करण्याचे काम त्यांनी सुरू केले आहे. गुलजार परफेक्शनिस्ट आहेत. त्यामुळे त्यांना शब्दन्‌शब्द समजून घ्यायचा आहे, जेणेकरून भाषांतर करताना अर्थ बदलणार नाही. गुलजार भाषांतराच्या कामात व्यग्र आहेत.



### * 'ज्ञानर्षी नरहर कुरुंदकर' चरित्रग्रंथाचे प्रकाशन

नरहर कुरुंदकर हे द्रष्टे विचारवंत होते. देशाच्या राजकारणातील काँग्रेसचे महत्त्व हळूहळू कमी होत जाईल, हे त्यांनी कधीच ओळखले होते. फोडाफोडीच्या राजकारणामुळे केंद्रात कुठल्याही एका पक्षाला बहुमत मिळणार नाही आणि मग ही सत्ता दुबळी होत जाईल, असा इशाराही त्यांनी दिला होता, तो आज खरा होताना दिसतो आहे, असे उद्गार समाजवादी नेते बापूसाहेब काळदाते यांनी काढले.

'ज्ञानर्षी नरहर कुरुंदकर' या प्रा. भुजंग वाडीकर लिखित चरित्रग्रंथाचे प्रकाशन काळदाते यांच्या हस्ते झाले. प्रा. वाडीकर यांनी या चरित्रग्रंथाद्वारे कुरुंदकर यांच्या जीवनाचे अतिशय चिकित्सेने रसग्रहण केले आहे, असे काळदाते म्हणाले. फ. मु. शिंदे यांनी यावेळी कुरुंदकर यांच्या आठवणींना उजळा दिला.

'संगत प्रकाशन'चे एल. के. कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. प्रभा कुरुंदकर, त्यांची कन्या श्यामल पत्की यांचा सत्कार यावेळी करण्यात आला.

### * 'प्रसारमाध्यमांनी चुकीची मराठी स्वीकारू नये'

''प्रसारमाध्यमांत वापरल्या जाणाऱ्या मराठीची जबाबदारी त्या माध्यमांतील संबंधित अधिकाऱ्यांबरोबरच श्रोते, प्रेक्षक आणि इतरांचीही आहे आणि त्यांनी चुकीची मराठी स्वीकारू नये,'' असे मत मराठी अभ्यास परिषदेने आयोजिलेल्या परिसंवादात व्यक्त करण्यात आले. श्रीरंग गोडबोले, संज्योत आमोंडीकर, उज्ज्वला बर्वे, प्र. ना. परांजपे, श्याम भुर्के, अनिल गोरे, डॉ. नीलिमा गुंडी आदींनी विचार मांडले.

''प्रसारमाध्यमांची संख्या वाढली आहे. त्याचबरोबर मराठीवर इंग्रजी आणि हिंदी भाषेचे संस्कारही होत आहेत. माध्यमांतील बातम्या, कार्यक्रम, जाहिराती यांवर त्याचा परिणाम होत आहे. अशा वेळी सर्वसामान्य श्रोत्यांनी माध्यमांमधील मराठी वापरातील दोष संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे आणि माध्यमांनीही त्याची दखल घ्यावी,'' असे मत बहुतेकांनी व्यक्त केले.

श्री. गोडबोले म्हणाले, ''दूरचित्रवाणीवर कार्यक्रम दाखविताना त्यांचे निर्माते आधी प्रेक्षकवर्ग निश्चित करीत असतात. येत्या काळात 'माध्यम संगम' होणार आहे. कार्यक्रम संग्रहित करून पाहण्याचे तंत्रज्ञान त्यामुळे शक्य होणार आहे. त्यामुळे मराठीबद्दल अधिक जागरुकता दाखविणे गरजेचे आहे. माध्यमांसाठी उमेदवारांची निवड करताना मराठी भाषेतील प्रावीण्य हा निकष असला पाहिजे. त्यामुळे माध्यमांतील मराठीचा दर्जा सुधारू शकेल.''

### * पीएच.डी. नोंदणीसाठी किमान गुणांची अट रद्द

पीएच.डी बाबत तत्कालीन कुलपती डॉ. महंमद फजल यांनी जारी केलेला आदेश रद्द करून डॉ. गजानन एकबोटे यांच्या समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचा निर्णय पुणे विद्यापीठाच्या विद्वत् परिषदेने घेतला.

डॉ. फजल यांच्या आदेशाद्वारे पीएच.डी. नोंदणीसाठी कल चाचणी घेण्याची; तसेच पदव्युत्तर पदवी परीक्षेत किमान साठ टक्के गुणाची अट लागू करण्यात आली होती. मात्र, त्यावर सर्व स्तरांतून आक्षेप नोंदविण्यात आले. या दोन्ही अटी रद्द करण्यासह काही वेगळ्या नियमांची शिफारस या समितीने केली.

राज्यातील सर्व विद्यापीठांतील पीएच.डी.च्या नोंदणीसाठी पुणे विद्यापीठामार्फत कल चाचणी घेतली जाते. आता ती होणार नाही. असे आश्वासन कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर यांनी दिले.

विशेष म्हणजे विद्यमान कुलपती एस. एम. कृष्णा यांनी स्वत:च डॉ. फजल यांचा आदेश हा फक्त 'मार्गदर्शनपर सूचनां'पुरता मर्यादित असल्याचे मत व्यक्त केले आहे. डॉ. फजल यांच्या आदेशानंतर महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यातील १४(८) या कलमाद्वारे कुलगुरूंनी जारी केलेला आदेश रद्द करण्यात आला.

पीएच.डी. नोंदणी, प्रबंध लेखन, मौखिक चाचण्या आदींबद्दल समितीच्या शिफारशीच ग्राह्य असल्याचे सांगण्यात आले. वैद्यक, औषधनिर्माणशास्त्र, विधी आदी व्यावसायिक शाखांतील उमेदवारांचा अनुभव, पीएच.डी. नोंदणीसाठी गृहीत धरण्याची शिफारस या समितीने केली आहे.

### * 'वाचनाची गोडी कमी झाल्याने ग्रंथालयांची स्थिती बिकट'

''ग्रंथालय हाच ज्ञान मिळविण्याचा सोपा मार्ग आहे. मात्र, लोकांमधील वाचनाची गोडी कमी होत असल्याने ग्रंथालयांची स्थिती बिकट होत आहे,'' अशी खंत सिद्धार्थ ग्रंथालयाचे कार्याध्यक्ष बापू गानला यांनी व्यक्त केली.

श्री. गानला म्हणाले,''लेखक-वाचक भेटी, काव्यवाचन, पुस्तक चर्चा, विविध क्षेत्रांतील मान्यवरांचे मार्गदर्शन आणि विविध वयोगटातील कलागुणांचा आविष्कारासाठी 'गप्पांगण' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.''

या वेळी शरद भांबुरे, रजनी दोशी, एम. सी. पिंजारी, शकुंतला पातरडे, डॉ. श्याम राजोरे,डॉ. इम्तियाज मुल्ला, अनिल पाडगावकर आदींनी मनोगत व्यक्त केले.

### * 'महाराष्ट्रातील स्त्रीवादाचे जनक महर्षी कर्वेच'

महर्षी कव यांनी स्त्रियांसाठी शिक्षणक्षेत्र खुले केल्यानेच महाराष्ट्रातील स्त्री आज स्वावलंबी, धाडसी जीवन जगत आहे, साहित्याच्या क्षेत्रात स्त्रीवाद मांडत आहे, अशी स्त्री देशातील इतर कोणत्याच प्रांतामध्ये दिसणार नाही, असे प्रतिपादन डॉ. आनंद यादव यांनी केले.

महर्षी कर्वे यांच्या १४७ व्या जयंतीनिमित्त 'स्मृतींच्या पाऊलखुणा' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. यावेळी नृत्यतपस्विनी रोहिणी भाटे, संस्थेच्या कार्याध्यक्षा सरिता भट, महर्षी कर्वे यांची नात दुर्गाताई आदि उपस्थित होते.



स्त्रियांचे लेखन हे पुरुषांच्या लेखनापेक्षा भिन्न असते. स्त्रिया अतिशय बारकाईने एखादा प्रसंग, डोळ्यापुढे सहजपणे उभ्या करतात, 'स्मृतींच्या पाऊलखुणा' या पुस्तकात एक सर्वसामान्य माणूस म्हणून त्यांनी जगलेले जीवन दिसते.

महर्षी कर्वे हे खऱ्या अर्थाने कर्ते समाजसुधारक होते. महर्षींच्या जन्मशताब्दीच्या वेळी मी माझ्या समूहासह त्या सोहळ्यात सहभागी झाले होते. त्यावेळी त्यांची उपस्थिती माझ्यासाठी खूप प्रेरणादायी ठरली होती, अशी आठवण नृत्यतपस्विनी रोहिणी भाटे यांनी सांगितली.

### * युद्धाला कंटाळलेल्या अमेरिकेत भयपटांची चलती

दहशतवादविरोधी युद्धाची वारंवार होणारी चर्चा, आवाहने, प्रसारमाध्यमांकडून होणारा युद्धविषयक बातम्यांचा भडिमार, शस्त्रनिर्मिती व युद्धाच्या मुद्यावरच लढविल्या जाणाऱ्या निवडणुका या साऱ्याला कंटाळलेल्या अमेरिकी नागरिकांनी यंदा भयपटांना कौल दिला आहे.

यंदा हॉलिवूडमध्ये तब्बल १२ भयपट प्रसिद्ध होत असून, या हंगामाचा प्रारंभ शुक्रवारी प्रसिद्ध झालेल्या 'हाऊस ऑफ वॅक्स' या चित्रपटाने झाला आहे. 'हाय टेन्शन', 'डार्क वॉटर', 'दि स्केलेटन की' हे चित्रपट प्रसिद्ध होण्याच्या मार्गावर आहेत. इराक युद्धाला कंटाळलेल्या अमेरिकी नागरिकांनी या काल्पनिक चित्रपटांची मनोरंजनासाठी निवड केली असल्याचे मानसशास्त्रज्ञांचे मत आहे.

### * ७ कोटींच्या बनावट 'सीडी' जप्त

बनावट 'सी. डी.' तयार करून मुंबईसह मोठ्या शहरांमध्ये विक्री करणाऱ्यांची मोठी टोळी जालना पोलिसांनी उद्ध्वस्त केली. ७ कोटी रुपयांच्या बनावट 'सी. डी.' जप्त करून अठरा उत्पादक व विक्रेत्यांना पोलिसांनी गजाआड केले.

बनावट सी.डी. बनविणाऱ्यांमुळे मूळ उद्योगाची फार मोठी हानी होत असे. या उद्योगातील बनावट 'सी.डी.' पकडण्यासाठी नेमलेले अधिकारी व पोलीस यांच्या संगनमताने आरोपी सुटत असत. मोठ्या प्रमाणात हप्ते बांधूनही उद्योगाला भरभराटी आलेली होती. या उद्योगातील 'टी सीरिज', 'व्हीनस', 'टिप्स', 'फाउन्टन', 'कुर्णाल', 'सरगम', 'म्युझिक क्राफ्ट' या कंपन्यांच्या बनावट सी. डी. बनवण्यात येत.

बसस्थानक मार्गावर बनावट सी. डी. विकणाऱ्या एका हातगाडीवाल्याला प्रथम पोलिसांनी पकडले. त्याला पोलिसी हिसका दाखवताच त्याने या 'सी. डी.' कोठून विकत घेतल्या ते सांगितले. पोलिसांनी नेहलानी या व्यापाऱ्याच्या दुकानावर छापा घातला.

'सी. डी. रायटर' यंत्राद्वारा निहलानी बनावट सी.डी. तयार करीत असे. पाच ते सहा रुपये किमतीची कोरी सी.डी. घेऊन त्यावर चित्रपटाची गीते व चित्रपट मुद्रित केले जात. या सी. डी.चे आवरण तयार करून घेतले जात असे. बनावट

गाण्याची सीडी ९ ते १० रुपयांना तर चित्रपटाची सीडी २० ते ४० रुपयांना विकली जात असे. गाण्यांची अस्सल सी.डी. २० ते ५० रुपये व चित्रपटाची ६० ते २०० रुपयांपर्यंत मिळते. ब्ल्यू फिल्मच्या बनावट सी.डी.ही २० ते २५ रुपयांना मिळतात. अशा प्रकारे कोट्यवधी रुपयांची उलाढाल या उद्योगातून होते. मूळ 'सी. डी.'मध्ये १२ ते १५ गाणी असतात. पण बनावट 'सी.डी.'मध्ये १५० ते ३०० गाणी असतात. जालन्यात अडीच कोटी, मुंबईत दीड कोटी, औरंगाबाद येथून दीड ते दोन कोटी रुपयांच्या व इतरत्र अशा एकूण ७ कोटी रुपये किमतीच्या बनावट सी.डी. जप्त केल्या.

## * घरातल्या संगणकांवर आता आवडीची पुस्तके

पुस्तकांच्या वाढत्या किंमती आणि घरांचा लहान आकार या व्यस्त गणिताच्या कचाट्यातून बाहेर पडण्यासाठी मराठी पुस्तकप्रेमींना एक नवा उपाय उपलब्ध होऊ लागला आहे. मराठमोळ्या घरांमध्ये संगणकमैत्री वाढू लागली असल्याने, सीडीच्या रूपातील ग्रंथांचा आणि आवडत्या पुस्तकांचा संग्रह एका छोट्याशा कप्प्यातदेखील ठेवता येणे शक्य होणार आहे.

घरामध्ये अमूल्य ग्रंथसंपदेचा संग्रह हा मराठमोळ्या मनाचा नेहमीच अभिमानबिंदू राहिला आहे. मात्र आजकाल टू-रूम-किचनच्या जमान्यात, पुस्तकांसाठी कपाटे बनवून घराची जागा त्या करिता अडविणे अडचणीचे ठरते.

किंबहुना, जागेच्या समस्येमुळे अनेक मराठी वाचकांनी आपल्याकडील पुस्तके ग्रंथालयांना वगैरे भेटीदाखल देऊन त्यांच्या जतनाच्या जबाबदारीतून अनिच्छेने मुक्ती मिळविलेली दिसते. मात्र, अशा वाचकांचे ग्रंथप्रेम तिळभरही कमी झालेले नसते, हे त्यांच्या हळहळण्यावरून वारंवार स्पष्ट होत जाते.

मराठी वाचकांची या कोंडीतून मुक्तता करण्यासाठी आता संगणकयुगाचा फार मोठा हातभार लागणार आहे. महागड्या पुस्तकांच्या खरेदीसाठी न पेलणारा आर्थिक बोजा आणि जागेचा अभाव या दोन्ही समस्यांवर संगणकाच्या माध्यमातून जाणारा एक मार्ग आता अनेक मराठी घरांनी स्वकारला आहे.

सीडी रूपाने मिळणारी पुस्तके खरेदी करण्याकडे मराठी वाचकांचा कलही आता वाढू लागला आहे, हे ओळखून संगणक प्रकाशन या संस्थेने खास मराठी ग्रंथप्रेमींसाठी ई-बुक्स निर्मितीचे महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले आहेत. मराठी माध्यमातून संगणकाची ओळख करून देणारे स्तंभलेखक पत्रकार माधव शिरवाळकर यांची संगणकविषयक मराठी पुस्तके संगणक प्रकाशनाने आता ई-बुक स्वरूपात उपलब्ध करून दिली आहेत. ई-मेल आणि चॅट, सर्वांसाठी फोटोशॉप, कॉम्प्युटर व्हायरस, सर्वोत्कृष्ट वेबसाईटस्, डिरेक्टरी व संगणक जगत हा एकूण ८०० रुपये किमतीचा पुस्तकांचा ई-संच सीडी रूपाने केवळ दीडशे रुपयांत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



ही पुस्तके कोणत्याही संगणकावर सहजपणे वाचता येतील. त्यासाठी तुमच्या संगणकावर मराठी फॉन्ट असण्याची गरज नाही. संगणकाचे जुजबी ज्ञान असलेल्यांनादेखील ही ई-बुक्स सहजपणे हाताळता येतील.

**संपर्क -** संगणक प्रकाशन, ५-६ शांति निवास, संत रामदास रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई-८१.

## * मुलांनी पुस्तकांमधून प्रेरणा घ्यावी

विनोबाजींनी लिहिलेल्या 'गीताई'च्या माध्यमातून आदर्श आईची संकल्पना साकार केली. आईप्रमाणेच पुस्तकाचे स्थान हे प्रेरणादायी असते. त्यामुळे मुलांनी पुस्तकातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन गांधी राष्ट्रीय स्मारकाच्या विश्वस्त शोभना रानडे यांनी केले.

सुभाष देशपांडे लिखित 'विनूची आई'च्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा यांच्या अध्यक्षतेखाली आणि शोभना रानडे यांच्या हस्ते करण्यात आले. 'आई' नसलेल्या मुलांच्या या 'आई'च्या बालग्राममध्ये आयोजित 'विनूची आई'चे प्रकाशन करीत असताना विनोबाजींच्या आठवणींना त्यांनी उजाळा दिला. 'बालग्राम'मधील मुलांनी विनोबाजींच्या जीवनावर आधारित गोष्टी व गीते सादर केली. या प्रसंगी श्रीमती आशा सेठ, डॉ. निर्मला सारडा, अविनाश चाफेकर यांची भाषणे झाली.

## * बीएसएनएलच्या सूचना महाराष्ट्रदिनापासून मराठीत

भारत संचार निगम लिमिटेडकडून महाराष्ट्राला तब्बल २८ वर्षांनी न्याय मिळाला आहे. महाराष्ट्रदिनापासून बीएसएनएलच्या दूरध्वनी आणि मोबाईलवरून सूचना मराठीमधून सूचना ऐकायला मिळत आहेत.

विविध प्रकारची माहिती घेण्यासाठी किंवा अपेक्षित व्यक्तीचा दूरध्वनी क्रमांक विचारण्यासाठी १९८, १९७, १५००, २४३६५ या क्रमांकांवर संपर्क केल्यास बीएसएनएलकडून ती माहिती आपल्याला कळते. सध्या या सर्व क्रमांकांवर संपर्क केल्यास प्रथम इंग्रजी, नंतर हिंदी आणि शेवटी मराठी भाषेत माहिती मिळते. एवढेच नाहीतर बीएसएनएलच्या मोबाईलवर संपर्क केल्यास संपूर्ण मराठीमधूनच सूचना मिळतात. 'इंग्रजीसाठी एक, हिंदीसाठी दोन आणि मराठीसाठी तीन क्रमांक दाबा' ही सूचना इंग्रजीमधूनच ऐकवण्यात येते. त्यामुळे बऱ्याच वेळेला इंग्रजीचाच वापर होऊन तीन क्रमांक दाबून मराठीपर्यंत कोणी पोहोचतच नाही. वास्तविक केंद्र शासनाच्या राजभाषा विभागातर्फे १९७७ मध्ये भाषासंदर्भात एक परिपत्रक काढण्यात आले होते. सर्व राज्यांतील केंद्र शासनाच्या कार्यालयांत त्या त्या राज्याची स्थानिक भाषा प्रथम त्यानंतर हिंदी आणि शेवटी इंग्रजी वापरावी, असा आदेश त्या पत्रकात देण्यात आला होता.

## * 'पहिलीपासून इंग्रजी'मुळे न्यूनगंड कमी होत आहे...

'मराठी माणसांचा, विशेषत: बहुजन समाजाचा इंग्रजीचा न्यूनगंड कमी होत आहे, हे 'पहिलीपासून इंग्रजी' उपक्रमाचे सर्वांत महत्त्वाचे फलित आहे. उपक्रमातील त्रुटी दूर केल्यास पुढील पिढी आत्मविश्वासाने जगाची ज्ञानभाषा हाताळू शकेल,' असे मत एका चर्चासत्रात व्यक्त करण्यात आले.

फर्ग्युसन महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी मंडळातर्फे झालेल्या चर्चासत्राला 'सकाळ'चे संचालक-संपादक डॉ. अरुण टिकेकर यांच्या बीजभाषणाने प्रारंभ झाला. 'बालभारती'चे संचालक डॉ. वसंत काळपांडे अध्यक्षस्थानी होते. पुणे विद्यापीठाच्या इंग्रजी विभागाचे डॉ. श्रीधर गोखले, पाठ्यपुस्तक मंडळातील धनवंती हर्डीकर, प्रा. पद्माकर विसपुते, डॉ. सुनंदा एडके यांनी त्यात मते मांडली.

'पहिलीपासून इंग्रजी' हा काही मराठीशी झगडा नाही, असे स्पष्ट करून डॉ. टिकेकर म्हणाले, ''सामाजिक न्याय व इंग्रजीविषयीचा न्यूनगंड घालविण्याच्या दृष्टीने हा निर्णय मूलगामी आहे. पुढील पाच वर्षांत इंग्रजीच्या आधारावरच भारत, चीन, जपान आदी देशांची तुलना होणार आहे. इंग्रजी जागतिक ज्ञानभाषा असल्याने ती आत्मसात करण्याला पर्याय नाही. भाषाविषयक अनास्था दूर करणे हा उपक्रमाचा दुसरा हेतू. शिक्षक-प्राध्यापकांचे इंग्रजी वाचन कमी आहे. भाषेशिवाय सामाजिक, सांस्कृतिक व भावनिक वाढ होणार नाही, हे समाजाने लक्षात घ्यावे.''

इंग्रजीचा उपक्रम राबविताना केवळ शिक्षकांचे नव्हे, तर पालकांचेही प्रशिक्षण महत्त्वाचे आहे, असे मत डॉ. श्रीधर गोखले यांनी व्यक्त केले. पहिली ते चौथीतील मुले इंग्रजी कविता छान म्हणतात; मात्र लेखन, वाचनात कमी पडत असल्याचे डॉ. विसपुते यांनी नमूद केले. इंग्रजी शिकविणाऱ्या शिक्षकांत आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी, त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी शिक्षण खात्याने स्वतंत्र विभाग सुरू करावा, शिक्षकांचे गटपातळीवर मेळावे घ्यावेत, इंग्रजीत पारंगत तज्ज्ञांना प्रशिक्षक म्हणून नेमावे. शिक्षकांनी अनौपचारिक पुस्तिकांद्वारे वर्गातील अनुभव एकमेकांना सांगावेत, असे डॉ. एडके यांनी सुचविले. डॉ. हर्डीकर म्हणाल्या, ''भाषा शिकताना मुलांवर दडपण नको, हे पहिले उद्दिष्ट होते. इंग्रजीविषयीच्या नकारात्मक अनुभवांचे दडपण मनावर असलेल्या शिक्षकांची भीती घालवून या उपक्रमाकडे सकारात्मक दृष्टीने पाहायला हवे.''

डॉ. काळपांडे म्हणाले, ''पहिलीपासून इंग्रजीच्या निर्णयावर बुद्धिवाद्यांनी टीका केली; मात्र बहुजन समाजाच्या मनात वेगळेच होते. मुले चुका करीतच इंग्रजी शिकणार आहेत. शिक्षकांच्या प्रशिक्षणाविषयी तज्ज्ञांनी मार्गदर्शन करावे.''

## * ज्ञानाची 'ओपन स्पेस!'

सध्याच्या शहराच्या बदलत्या स्वरूपानुसार ग्रंथालयांच्या अंतरंगातही बदल होत असून प्रभात रस्त्यालगत आयकर भवनच्या जवळ असणारं 'ओपन स्पेस' हे ग्रंथालयांच्या आधुनिकिकरणाकडे टाकलेलं महत्त्वाचं पाऊल ठरेल!



'सेंटर फॉर कम्युनिकेशन अँड डेव्हलपमेंट स्टडीज' (सीसीडीएस) या संस्थेतर्फे दोन वर्षांपूर्वी ग्रंथालय सुरू करण्यात आले.

शहरातील इतर ग्रंथालयांपेक्षा यांचे स्वरूप भिन्न आहे. 'ओपन स्पेस' या नावातच ग्रंथालयाचा उद्देश स्पष्ट होतो. खरंतर या ग्रंथालयाच्या जागेस 'लायब्ररी' म्हणून संबोधणे अधिक संयुक्तिक ठरेल. कारण, खरोखरच 'ओपन स्पेस' म्हणजे जुन्या काळातील पुस्तकांच्या कपाटांनी भरलेलं ग्रंथालय नसून आधुनिक काळाशी सुसंगत सुविधा पुरवणारे संदर्भ केंद्र आहे.

नव्या पिढीला वाचनाकडे आकृष्ट करून घेण्यासाठी सीसीडीएसचा एक उपक्रम म्हणून या लायब्ररीची सुरुवात करण्यात आली आहे. आलिशान इमारतीच्या प्रशस्त फ्लॅटमधील या लायब्ररीमध्ये प्रवेश करताना क्षणभर आपण रस्ता चुकलो तर नाही ना, असा विचार मनाला स्पर्शून जातो. एखाद्या फ्लॅटच्या 'लिव्हिंग रूम'मध्ये आल्याचा भास व्हावा, अशीच लायब्ररीची रचना आहे. शेती, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, ह्युमन राईट्स, पर्यावरण, साहित्य, मिडिया अशा विषयांवरील सातशेवर पुस्तकांचा संग्रह येथे आहे. त्याचप्रमाणे लहान मुलं आणि महिलांसाठीच्या पुस्तकांचा स्वतंत्र विभागही आहे.

विषयांच्या वर्गीकरणानुसार त्यासंबंधी प्रमुख वृत्तपत्रांमध्ये छापून आलेले लेख, बातम्या यांच्या कात्रणांचा संग्रहदेखील केला जातो.

'ओपन स्पेस'मध्ये 'लिव्हिंग रूम' प्रमाणेच सभासद वाचकांसाठी स्वतंत्र रुमचीही व्यवस्था आहे. सभासदांसाठी इंटरनेटची सुविधाही उपलब्ध आहे.

केवळ पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञानप्रसार अशी मर्यादित भूमिका न घेता 'ओपन स्पेस'तर्फे विविध कार्यक्रमांची आखणी करण्यात येते. युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि भारतातील महिलांनी बनवलेल्या डॉक्युमेंटरीज्, शॉर्ट ॲनिमेशन फिल्म्स् दाखवण्यात येतात.

वाचकवर्ग वाढवण्यासाठी 'ओपन स्पेस' सर्वच ग्रंथालयांना मार्गदर्शक ठरेल.

## * पंचक्रोशी साहित्य संमेलन

'नदी हे वाईनगरीचे वैशिष्ट्य असून नदीच्या दोन्ही तीरावर संस्कृती वसली आहे. वाईतील विलोभनीय मंदिरे हे त्याचे वैभव आहे. मंदिरातील देव आणि माणूस यामध्ये नसलेला मध्यस्थ हे वाईचे वैशिष्ट्य आहे. मुंबई शहरातील पाण्याच्या मोठ्या पाईपलाईनशेजारी झोपड्यांची संस्कृती वसली आहे, हा सर्व संघर्ष पाण्यासाठीच आहे; परंतु नदीकाठावर वसलेली संस्कृती ही सांस्कृतिक तृष्णेच्या ध्यासाने वसलेली आहे,' असे मत वाई पंचक्रोशी मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटक कवी अशोक नायगावकर यांनी व्यक्त केले.

वाई, खंडाळा, जावली, महाबळेश्वर येथील साहित्य रसिकांचे दुसरे वाई पंचक्रोशी मराठी साहित्य संमेलन साहित्य संमेलनाचे मावळते अध्यक्ष डॉ. पंडितराव टापरे, यमुनाबाई वाईकर, स्वागताध्यक्ष आमदार मदन भोसले, साहित्य

संमेलनाचे अध्यक्ष डॉ. व. स. जोशी यांच्या उपस्थितीत पार पडले.

लावणीसम्राज्ञी यमुनाबाई वाईकर यांना जीवनगौरव पुरस्कार व. न. पटवर्धन यांच्या हस्ते देण्यात आला.

नायगावकर म्हणाले, 'सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात साहित्याचे धुमारे फुटतात. कवीने ओवी, छंद, अभंग काय आहे, त्याची सुरुवात काय आहे, हे पाहणे आवश्यक आहे. तरुण पिढी हे सर्व विसरली आहे. ती क्वचितच बेफाम होते. नामदेव, तुकारामांचे विचार विसरले जातात. ग्रामीण जीवन व्यक्त करणारी कादंबरी वाचली जाते काय?'

डॉ. वसंत जोशी म्हणाले, 'अशा संमेलनात नवोदितांना साहित्यविकासाला वाव मिळतो, त्याच्यात साहित्यप्रेमाचे दृढ बंध निर्माण होतात. अशी साहित्य संमेलने हा साहित्याच्या सामाजिक अभिसरणाचा उत्तम मार्ग आहे. त्या-त्या साहित्य संमेलनातून त्या-त्या समाजाचे विचार, तत्त्वज्ञान याच्या मांडणीचा परामर्श घेता येतो. नव्याचा स्वीकार करत असताना जुन्याचे स्मरण ठेवून त्याची नोंद ठेवली पाहिजे. वाई शहरात विश्वकोश प्राज्ञपाठशाळा, लोकमान्य टिळक ग्रंथालय, किसन वीर महाविद्यालय, ब्राह्मोसमाज, शिवाजी वाचनालय, ग. गो. जाधव ग्रंथालय, यांनी समाज सजगता जोपासली आहे. अशी साहित्य संमेलने समाजाची ऊर्जाकेंद्रे आहेत. मुंबईसारख्या मराठी राजधानीत बहुसंख्य मराठी माणूस अल्पसंख्याक बनला आहे. मराठी माणसाची घरे, हिंदी भाषिकांच्या ताब्यात चालली आहेत. तेलगू तामिळी, कन्नड भाषिकांनी आपली भाषा, लिपी, अभिमान, अस्तित्व कडवेपणाने सांभाळले आहे. मराठी माणूस कष्टाच्या मागे न धावता नोकरीच्या मागे लागला आहे. मराठी भाषा साहित्य या साऱ्याचा संकोच होण्यापूर्वी आपण सावध होऊन मराठी भाषेचा जाणीवपूर्वक वापर करणे आवश्यक आहे.

ते म्हणाले, 'वाई शहरातील सांस्कृतिक वातावरण, कीर्तन, प्रवचने, गायन यांच्यामुळे तयार झाले आहे. येथे साहित्य अभ्यासले जाते, निर्मिले जाते. नाट्य, संगीत, साहित्य, वेदाभ्यास, कोशशास्त्र, समाजकारण, राजकारण याच रूची घेणारी माणसे निर्माण होतात. मराठीचे पहिले कादंबरीकार लक्ष्मणशास्त्री हळबे, नवनीतकार परशुरामपंत गोडबोले, महादेवशास्त्री कोल्हटकर, धर्मशास्त्रावरील अधिकारी भाऊशास्त्री लेले, केवलानंद सरस्वती, जागतिक कीर्तीचे लक्ष्मणशास्त्री जोशी, सत्यशोधक समाजाचे रा. ना. चव्हाण, तत्त्वज्ञ मे. पुं. रेगे, इतिहास अभ्यासक सु. र. देशापांडे, ग्रंथ चळवळीचे प्रणेते डॉ. शिवाजीराव चव्हाण यांनी वाईतील साहित्य चळवळ जिवंत ठेवली. यामध्ये नवोदित साहित्यिकांनी भर घालून अशी साहित्य संमेलने यशस्वी करावीत.'

*** उपनगरीय साहित्य संमेलने अधिक अनौपचारिक व्हावीत**

उपनगरीय साहित्य संमेलनाचे आयोजन करणाऱ्यांनी त्यांचे स्वरूप प्रातिनिधिक साहित्य संमेलनासारखे 'स्टिरीओ टाईप'न करता त्यामध्ये अनौपचारिकता आणण्यासाठी



प्रयत्न केले पाहिजेत, अशी अपेक्षा ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रा. ग. जाधव यांनी व्यक्त केली.

'साहित्यिक कलावंत प्रतिष्ठान'तर्फे वारजे-कर्वेनगर आणि कोथरूड परिसरात आयोजित करण्यात आलेल्या पाचव्या साहित्यिक कलावंत संमेलनात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. या संमेलनाचे उद्घाटन राज्याचे जलसंपदामंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले.

अखिल मराठी साहित्य संमेलनाबरोबरच उपनगरीय साहित्य संमेलनांचे संपूर्ण राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर आयोजन होत असल्याचे नमूद करून प्रा. जाधव म्हणाले की, साहित्यसंस्कृती परिपक्व होत चालल्याचे हे उत्तम उदाहरण आहे. अशा संमेलनांच्या माध्यमातून नवोदित साहित्यिकांना एकत्र आणण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. त्याचबरोबर या संमेलनांना स्वत:ची वेगळी ओळख करून देणेही आवश्यक आहे. तसेच, ही संमेलने पुरुषप्रधान होऊ नयेत यासाठी त्यामध्ये महिलांचा सहभागही वाढला पाहिजे. या संमेलनांना फक्त साहित्यिकांनाच न बोलावता आपल्या भागातील डॉक्टर, उद्योजक अशा सर्वच क्षेत्रांतील रसिकांना आणि अन्य भाषिक साहित्यिकांनाही आवर्जून बोलाविले पाहिजे. या संमेलनांमध्ये नवोदितांना उत्तेजन देण्यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत. ज्येष्ठ साहित्यिकांबरोबर नवोदितांची अनौपचारिक चर्चा घडवून आणली पाहिजे. चांगले वाचक निर्माण करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. कारण चांगला वाचकच भविष्यात चांगला लेखक होऊ शकतो.

साहित्यिकांनी सामाजिक जाणीव ठेवावी अशी अपेक्षा व्यक्त करून ना. अजित पवार म्हणाले की, शासनातर्फे गाडगे महाराज स्वच्छता अभियानासारख्या अनेक चांगल्या योजना राबविण्यात येतात. राजकारण करण्याचा या योजनांचा हेतू नसतो. या योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी साहित्यिकांनी शासनाला मदत करावी. ❐



**दक्षिणायन** केपहॉर्न ते कॅरिबियन

डॉ.रणजित मिरजे

**अभिप्राय** - *एक सुंदर पुस्तक. लेखकाचं हे पहिलंच पुस्तक पण सहजता,प्रवाहीपणा,आणि चित्रदर्शी शैली लाजवाब!लेखकाच्या पुढच्या पुस्तकाची आम्ही वाट पहात आहोत.* - कात्यायनी बोडस


***किंमत : २५० रु. सभासदांना : १८८रु. पोस्टेज : २५रु.***

## पुस्तक परिचय

# सिटी ऑफ बोन्स

**मायकेल कॉनेली / अनु.अजित ठाकूर**

**एक छोटेसे हाड**
**एका कुत्र्याला सापडते,**
**आणि-**




मायकेल कॉर्नेली या लेखकाच्या सिटी ऑफ बोन्स या रहस्यकथेचा मराठी अनुवाद अजित ठाकूर यांनी केला असून तो मेहता पब्लिशिंग हाऊसने बाजारात आणला आहे.

वंडरलँडमधील लॉरेल कॅनियन येथील एका नागरिकाचा फोन लॉस एंजेलिसमधील पोलिस डिटेक्टिव्हला येतो. ''माझा कुत्रा नुकताच गावाजवळच्या जंगलातून तोंडात एक हाड घेऊन पळत आला आहे. हे हाड मानवी असावे आणि तेही एका मुलाच्या दंडाचे असावे असे वाटते.''

डिटेक्टिव्ह हॅरी बॉश हा त्या फोनच्या संदर्भात अधिक माहिती मिळवण्यासाठी सँटा मोनिका पर्वतात कोरून काढल्यासारख्या लॉरेल कॅनियन दरीतील वंडरलँड अ‍ॅव्हेन्यूकडे आपला मोर्चा वळवतो. दाट जंगलात डोंगर उतारावर विखुरलेल्या त्या श्रीमंती वस्तीत हाडांच्या अनुषंगाने तपास करणे म्हणजे एक भलतेच आव्हान आहे. हे हॅरी बॉशच्या लक्षात येते. पोलिसांचे टेहळणी पथक तेथे आधीच आलेले असते आणि तपकिरी काळसर रंगाच्या त्या हाडाची पहाणी करून ''हे हाड म्हणजे ह्युमेरस. हे हाड माणसाचंच आहे.'' असे डॉ. पॉल गुयोट सांगतात. ते हाड ज्या कुत्रीने आणले तीही तेथेच असते. यलो लॅब जातीची ती कुत्री असते.

बॉश कारच्या डिकीतून क्राइम सीन इक्विपमेंट बॉक्स काढून तिच्यातील आपले खास बूट काढून पायात घालतो आणि पोलॅराइड कॅमेरा घेऊन ज्युलिया ब्रॅशर या सहकारी पोलिस महिलेसह त्या कुत्रीच्या मागोमाग जात हाड सापडलेल्या ठिकाणाचा माग काढतो.

- एका जागी नुकतीच उकरलेली जमीन त्यांना दिसते. तेथे बरीच हाडे सापडतात. ती हाडे गोळा करून घेऊन जाणे हे पोलिस नियमात बसत नसल्याने हॅरी त्यांचे फोटो घेतो... उतारावरून परतताना पायाखालची मऊ जमीन घसरते



आणि तो पाईनच्या बुंध्याला जोराने धडकून खाली आपटतो. त्याचा शर्ट फाटतो. थोडे खरचटतेही. त्याची बरगडी तुटली असावी असा अंदाज डॉक्टर व्यक्त करतात.

हाड सापडलेल्या परिसराचा पोलिस अधिकारी कसून शोध घेतात. प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधीही गर्दी करतात. स्थानिक वैद्यकीय अधिकारी टेरेसा कोराझॉन हीही तेथे उपस्थित असते. ती न्यायालयीन खटल्यांमध्ये कायदेतज्ज्ञ म्हणून टीव्हीवर नेहमी झळकत असते. पोलिस आणि कायदा या संदर्भातील मालिकांत तिचा दबदबा असतो.

त्या स्थळी उत्खनन करून हाडे काढण्यात येतात. त्यांची तपासणी करण्यात येते... जवळच मातीत घुसलेली लहान मुलाची कवटी सापडते. तसेच तेथे २५ सेंटचे एक नाणे सापडते. त्यावर १९७५चा उल्लेख असतो. म्हणजे हा मृत्यू १९७५ नंतरचा असणार - असा निष्कर्ष निघतो. मृतदेहाच्या कमरेच्या हाडांचा सांगाडा आणि पाठीच्या कण्याचा खालचा भाग हे जसेच्या तसे आढळतात; त्यावरून खड्डा सहा इंच ते एक फूट यापेक्षा जास्त खोल नसावा. घाईघाईत प्रेत पुरण्यात आले असावे, देह लांबवर आणण्यामागे काळजीपूर्वक योजना दिसते... प्रेताच्या पाठीवर पिशवी असते. ती कुजलेली असते. कॅलिफोर्निया विद्यापीठातील मानववंशशास्त्र विभागातील कायदा सल्लागार डॉ. विल्यम गॉलिव्हर यांनाही ते प्रेत दाखवण्यात येते.

> ...या तपशीलावरून हॅरी बॉश त्या मुलाचा, त्याच्या नावाचा, कुटुंबाचा, त्याच्या खुन्याचा शोध लावण्यासाठी जे सव्यापसव्य करतो त्याची थरारक कहाणी 'सिटी ऑफ बोन्स' मध्ये वाचायला मिळते.

''मुलगा दहा वर्षाचा असावा. कॉकेसाइड वंशाचा. त्याच्यावर बरीच वर्षे शारीरिक अत्याचार होत असावे. त्याची वाढ त्यामुळे खुंटलेली असावी. त्यामुळे मुलगा १२ वर्षाचाही असू शकेल. मृत्यूला २०/२५ वर्षे झाली असावीत. शरीरावर ४४ जखमा दिसून येत आहेत. खूप जोरात हात पिळल्यामुळे पडलेल्या चिराही दिसत आहेत. मेंदूची शस्त्रक्रिया झाल्याच्या खुणाही आढळतात.''

हॅरी बॉशला ते सर्व ऐकून या मुलाला छळणाऱ्या गुन्हेगाराचा तपास लावण्याची जबरदस्त प्रेरणा मिळते. ''मी या माणसाला पकडणारच.''

त्या प्रेतावरच्या शर्टावर 'सॉलिड सर्फ' अशी अक्षरे दिसतात. पिशवीच्या कप्प्यावर बी हे अक्षर दिसते. एक कागद सापडतो. पण त्यावरचा मजकूर वाचता येत नाही.

...या एवढ्या तपशीलावरून हॅरी बॉश त्या मुलाचा, त्याच्या नावाचा, कुटुंबाचा, त्याच्या खुन्याचा शोध लावण्यासाठी जे सव्यापसव्य करतो त्याची थरारक कहाणी 'सिटी ऑफ बोन्स' मध्ये वाचायला मिळते. पोलिस यंत्रणेचे कामकाज कसे चालते याचीही झलक त्यामुळे बघायला मिळते. हॅरी बॉशबरोबर काम करता करता ज्युलिया

ब्रॅशर त्याच्या प्रेमात पडते.

वंडरलँडच्या परिसरातील सर्व नागरिकांची माहिती संगणकावरून पडताळून पाहण्यात येते. बळी पडलेल्या मुलाची ओळख पटवण्यासाठी कोणी पुढे येते का यासाठी वृत्तपत्रांतून आवाहन करण्यात येते. लॉस एंजेलिस भागातील २९ इस्पितळांशी संपर्क साधून १९७५-८५ या काळातील ट्रेफिन करवत वापरून मेंदूची शस्त्रक्रिया झालेल्या १६ वर्षाखालील पुरुष व्यक्तीची माहिती मिळवण्यासाठी आदेश काढण्यात येतो. या काळात हरवलेल्या मुलांबाबतच्या नोंदी तेथील पोलिस दप्तरातून मिळवण्यात येतात. त्याच्या मायक्रोफिल्म असतात. त्यातून एक महत्त्वाचा धागा मिळतो. १९९६ मध्ये एका नऊ वर्षाच्या मुलावर अत्याचार करणाऱ्या ५७ वर्षे वयाच्या निकोलस ट्रेंटचा संदर्भ सापडतो. त्याच्या चौकशीसाठी हॅरी बॉश जातो. ट्रेंट म्हणतो, ''मी त्या टेकडीवर कधी गेलो नाही. मुले तिकडे खेळायला जात, एवढे मला ठाऊक आहे.'' घराची तपासणी करताना एका खोक्यात जुने बूट दिसतात. त्यांना माती लागलेली असते. एका भिंतीवर प्राण्यांची मुंडकी लटकत असतात. स्केटिंगची फळी आणि फूटबॉल, मुलांची खेळणी इ. तेथे आढळतात. तो १९८४ पासून त्या घरात राहात असतो... त्याचे पूर्ववृत्त वृत्तपत्रात आल्यावर परिसरातील लोकांना धक्काच बसतो. कारण त्याला मुलांवरील अत्याचाराबद्दल शिक्षा झालेली असते हे लोकांना कळते.

''खुनाचा शोध घेणे म्हणजे बऱ्याच वेळा पुढची वाट बंद होणे. अनेक अडथळे येणे आणि अनेक परिश्रम व्यर्थ ठरणे...'' (१०९)

''खुनाचा शोध घेणे म्हणजे बऱ्याच वेळा पुढची वाट बंद होणे. अनेक अडथळे येणे आणि अनेक परिश्रम व्यर्थ ठरणे...''

निकोलस ट्रेंट बद्दलची चॅनेल ४ वरची आणि वृत्तपत्रातील बातमी कोणी दिली यावरून चौकशी सुरू होते. हॅरी बॉशला त्यात गुंतवण्याचा प्रयत्न होतो... हे आणखी एक उपकथानक. या तपासातली गुंतागुंत वाढवत नेते.

तेवढ्यात टीव्हीवर बातमी येते, ''लॉरेल कॅनियन इथे सापडलेली हाडे न्यू ऑर्लियन्स येथून पळून आलेल्या एका दहा वर्षाच्या मुलाची आहेत. त्याचे आईवडील लॉस एंजेलिसच्या पोलिसांना भेटायला येत आहेत. २५ वर्षांपूर्वी हा मुलगा हरवला होता. दातांच्या वैद्यकीय अहवालावरून त्या मुलाची ओळख पटली असे ते म्हणतात.''

- ही बातमी बनावट आहे, बातमी फोडणाऱ्याला शोधून काढण्यासाठी ती तयार करण्यात आलेली असते हे पुढे हॅरी बॉश स्पष्ट करतो.



- आणि पोलिस पुन्हा ट्रेंटच्या घरी जातात तर ते बंद असते. पोलिस दार फोडून आत शिरतात तर ट्रेंट बाथरूममधील शॉवरखाली गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसतो.

त्याने आत्महत्या केलेली असते. टेबलावरील चिठ्ठीत लिहिलेले असते, ''खून तुम्ही केला आहे. मी नाही...मला मुलं आवडतात.

''प्रेम! नाही... तुम्ही इतक्या दुष्टपणे जे केलंत त्यामुळे मला जगणं अशक्य झालं आहे. मी जगू शकत नाही.

''हे माझे मृत्युपत्र. माझा पैसा मुलांनाच द्यावा. मॉर्टनला हा पैसा वाटायला सांगा... मुलांसाठी तेवढे करा!''

हे आत्महत्येचे प्रकरण कथावस्तूला वेगळेच वळण देते.

खुनी दुसरा कोणीतरी असणार अशी शक्यता बळावते.

ट्रेंटच्या कागदपत्रांची छाननी केल्यावर तो अनाथ बेवारशी मुलांना कपडे व अन्न पुरवणाऱ्या संस्थांना वर्षानुवर्षे छोट्या छोट्या रकमा देणगी मदत म्हणून पाठवत असे; असे दिसून येते. अशा मदतीचा लाभ मिळणाऱ्या मुलांची छायाचित्रेही त्याच्याकडे शेकड्यांनी मिळतात.

ट्रेंटच्या कागदपत्रांची छाननी केल्यावर तो अनाथ बेवारशी मुलांना कपडे व अन्न पुरवणाऱ्या संस्थांना वर्षानुवर्षे छोट्या छोट्या रकमा देणगी मदत म्हणून पाठवत असे; असे दिसून आले. अशा मदतीचा लाभ मिळणाऱ्या मुलांची छायाचित्रेही त्याच्याकडे शेकड्यांनी मिळाली.

तशात चित्रपट-टीव्ही मालिकांना नट पुरवणाऱ्या शीला डेलाक्रुवाचा फोन येतो. ''माझा भाऊ आर्थर १९८० मध्ये चार मे रोजी शाळेला गेला तो परत आलाच नाही... वडिलांनी पोलिसात तक्रार केली होती... तो स्केटिंगच्या फळीवरून पडून जखमी झाला होता... तो द ब्रेंद्रेन या शाळेत जात होता... ती शाळा खास उनाड, मुलांसाठी होती. कारण त्याला मारामारी केल्याबद्दल इतर शाळांनी काढून टाकले होते... तो तब्येतीने किरकोळ होता. त्याला इतरांशी जमवून घेणे अवघड जाई... मारामारीत तो कधीकधी काळा निळा पडायचा... तो स्केटिंगची फळी जाताना घेऊन गेला असावा कारण ती नंतर दिसली नाही.... त्याला फारसे मित्र नव्हते... एक मित्र होता. जॉनी स्टोक्स. थोराड, वयानेही जास्त. तो गांजा ओढत असे असा माझ्या वडिलांना संशय होता. त्यांना तो आवडत नसे. जॉनीजवळ वडिलांनी आर्थरची चौकशी केली होती...'' ती आर्थरचा फोटो दाखवते.

- आणि आर्थरच्या वडिलांकडे जाऊन चौकशी केली जाते. सॅम्युएल डेलाक्रुवा गोल्फ कोर्सवर ड्रायव्हिंगच्या धावपट्टी अर्धवेळ काम करीत असतो.

जॉन स्टोक्स या आर्थरच्या मित्राबद्दल त्याजकडून माहिती मिळवतो. आर्थरची आई सॅम्युएलची पहिली पत्नी घटस्फोट घेऊन आता पुनर्विवाह करून ख्रिस्तीन

वॉटर्स म्हणून जगत असते; तिच्याकडेही डिटेक्टिव्ह बॉश चौकशी करतो.

ख्रिस्तीन वॉटर्स सांगते, तुम्ही १९८० मध्ये आर्थर बेपत्ता झाला म्हणताय. मी त्या आधीच दहा वर्षे त्या घरातून बाहेर पडले होते. आर्थर लहान होता. पण त्याला बरोबर घेता येणे शक्य नव्हते...

मी त्याला एक चिठ्ठी लिहून माझी अगतिकता व्यक्त केली होती... त्यानंतर मी घटस्फोट घेतला. शारीरिक छळ हे कारण... सॅम दारू पिऊन मला मारत असे. राक्षसासारखा... तो माझ्यापेक्षा सात वर्षांनी मोठा होता. आर्थरला तो मारत नसावा. मुलगी शीला हिलाही क्वचितच त्याने मारले असावे... मला मात्र रोज मारहाण होई... म्हणून मी घरातून पळून गेले...

हाडांबरोबर सापडलेल्या स्केटिंगच्या फळीची तपासणी केल्यावर १९७८ ते १९८६ या काळात अशा प्रकारच्या बोनी बोर्ड फळ्यांची निर्मिती होत होती असे उघड होते. त्या फळीच्या टोकावर १९८० असा वर्षाचा उल्लेख सापडतो

मी त्याला एक चिठ्ठी लिहून माझी अगतिकता व्यक्त केली होती... त्यानंतर मी घटस्फोट घेतला.शारीरिक छळ हे कारण ... सॅम दारू पिऊन मला मारत असे. राक्षसासारखा... तो माझ्यापेक्षा सात वर्षांनी मोठा होता. आर्थरला तो मारत नसावा. मुलगी शीला हिलाही क्वचितच त्याने मारले असावे...

आर्थरचा शाळकरी मित्र जॉनी स्टोक्स याचा शोध घेण्यात येतो. तो गाड्या धुण्याचे काम बॉशटेरिया नामक गॅरेजमध्ये रोजंदारीवर करतो असे कळते. त्याला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात येते... त्याच्या आईवडिलांचा शोध घेऊन त्यांना प्रश्न विचारले जातात.

शेवटी आर्थरचा खरा खुनी मिळतो... आर्थरच्या सापळ्यावर रीतीप्रमाणे अंत्यसंस्कार होतात...

अमेरिकेतील पोलिस यंत्रेणेच्या कार्यपद्धतीची या थरारकथेतून जी कल्पना येते, ती दिङ्मूढ करते.

तेथील समाजजीवनातील अस्थिरतेचे, गुंतागुंतीचे दर्शन या कथेतून घडते. गुन्ह्याला वाचा फुटतेच हेही स्पष्ट होते.

पोलिसखात्यालाही आपली प्रतिमा जपण्यासाठी खूप काही करावे लागते. अधिकाऱ्यांना प्रसंगी जीव धोक्यात घालावा लागतो. मृत्यूही पत्करावा लागतो. समाजात गुन्हेगारांचा शोध घेताना मानसशास्त्राचेही भान ठेवावे लागते आणि शोधक बुद्धीने छोट्यामोठ्या तपशीलाची, पुराव्याची छाननी करावी लागते. मग ती स्केटिंगची फळी असो, शर्टवरील ब्रँडनेम असो, बुटाची माती असो, कवटीतील जखमेची खूण असो... तपासाचे काम वेगवेगळ्या शास्त्र शाखांची मदत घेऊन करावे लागते. रहस्याचा उलगडा करणे हे तसे कौशल्याचेच काम असते.


**पृष्ठे : ३६० ● किंमत : २४०रु. ● सभासदांना : १९२रु. ● पोस्टेज : २०रु.**



## विज्ञानाचा समाजधारणेवरील परिणाम

**बर्ट्रांड रसेल / अनु. कमलाकर दीक्षित**

**सैन्यदल व शस्त्रास्त्रे यांची मक्तेदारी असलेले, भयमुक्त विश्वराज्य स्थापन होणार का?**




'विज्ञानाचा समाजधारणेवरील परिणाम' हे बर्ट्रांड रसेल यांच्या 'इम्पॅक्ट ऑफ सायन्स ऑन सोसायटी'या पुस्तकाचे मराठी भाषांतर; विज्ञान-उदारीकरण-खुले अर्थकारण यांच्या आजच्या काळात आपल्या विचारांना योग्य दिशा देणारे ठरेल.

एक थोर विचारवंत म्हणून बर्ट्रांड रसेल यांचे नाव आपल्याला ज्ञात आहे. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील मूलगामी ज्ञानाचा शोध घेणे आणि आपले जीवन अधिक सुखी व शांततामय, अर्थपूर्ण कसे होईल या दिशेने उचित विचारधारेचे प्रतिपादन करणे या दोन प्रवृत्तींना आपल्या जीवनात आणि चिंतनात अग्रक्रम आहे असे त्यांनी स्वत:च नमूद केले आहे. रशियन राज्यक्रांतीची वाटचाल हुकुमशाही आणि व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी याच दिशेने होणार हे १९२० साली त्यांनी रशियाला भेट देऊन सांगितले; असे भाकित करणारे ते पहिलेच विचारवंत होते.

पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास, पोलिटिकल आयडिअल्स, प्रिन्सिपल्स ऑफ सोशल रिकन्स्ट्रक्शन, रोड्स टू फ्रीडम, दि प्रॉस्पेक्ट्स ऑफ इंडस्ट्रियल सिव्हिलायझेशन, पॉवर, एज्युकेशन स्पेशली इन अर्ली चाइल्डहूड, एज्युकेशन अँड द सोशन ऑर्डर वगैरे त्यांचे ग्रंथ हे अभिनव वैचारिक मांडणीमुळे खळबळजनक तसेच पथप्रदर्शक ठरले. १९५० मधे साहित्याचा नोबेल पुरस्कार त्यांना प्राप्त झाला.

'टू लव्ह अँड टू थींक' (करुणा/प्रेम आणि विवेक) ही त्यांच्या एकूणच जीवनाची व चिंतनाची द्विसूत्री होती. ते ईश्वर मानत नव्हते; म्हणजे नास्तिक होते; परंतु मानवतेचे अधिष्ठान मांगल्य हे आहे असा त्यांचा विश्वास होता. ए फ्री मॅन्स वरशिप (अश्रद्धाचे मुक्तिसाधन) हा त्यांचा लेख ''आपल्या व्यक्तिगत सुखासाठी धडपड न करता, क्षणिक आशा-आकांक्षा-लालसा यांच्या आहारी न जाता, मानवी जीवनातील भव्य, दिव्य, आदर्शाच्या उत्कट ओढीने अंत:करण सतत प्रज्वलित

ठेवणे हीच नास्तिकाची साधना व मुक्तता होय'' असे प्रतिपादन करणारा आहे. नीती आणि ईश्वर, नीती आणि धर्म, नीती आणि रूढी व परंपरा यांची फारकत करून, देव, धर्म, स्वर्ग वगैरे कल्पना बाद ठरवून, शुद्ध विवेकाच्या आधारावर जगण्याचा आग्रह ते धरतात; समाजाचा घटक म्हणून जगताना जे काही नीतिनियम आवश्यक ठरतात, ते पाळण्याची सुबुद्ध जाणीव हा नीतीचा आधार व्हायला हवा, अन्य काल्पनिक आधारांची गरज नाही, असे त्यांचे प्रतिपादन होते.

समाजधारणेवरील विज्ञानाचा परिणाम हे त्यांचे पुस्तक १९५२ मध्ये प्रथम प्रसिद्ध झाले. पन्नास वर्षांपूर्वीचे हे चिंतन आजही तितकेच महत्त्वपूर्ण आहे असे दिसून येते.

प्रस्तावनेत प्रा. देवदत्त दाभोलकर यांनी रसेलच्या प्रतिपादनाचे मुख्य सूत्र स्पष्ट केले आहे. **विज्ञान नसले की त्याच्या जागी केवळ अज्ञान राहत नाही तर विपरीत ज्ञान, ती पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न करते.** आधिभौतिक कारणे सापडली नाहीत तर आधिदैविक कारणांकडे मनुष्याचे मन वळते. मग इंद्र ही पर्जन्याची देवता निर्माण होते. असेच इतर बाबतीतही घडते. शास्त्रीय ज्ञानाच्या सहाय्याने मानवही काही चमत्कार करू शकेल अशी परिस्थिती निर्माण होते. **विज्ञानाच्या प्रगतीचा पहिला आघात अंधश्रद्धांवर होतो.** या श्रद्धा माणसाच्या अंत:करणात, त्याच्या भावजीवनात खोलवर रुजलेल्या असतात, त्यामुळे विज्ञानाच्या प्रकाशात त्या लागलीच लोप पावतात असे सहसा घडत नाही. **विज्ञानाच्या क्षेत्रात देवाची कल्पना बाजूला जाऊन निसर्गशक्तीशी आपला सरळ सामना सुरू होतो.** या युद्धात मानव उत्तरोत्तर विजयी होत आलेला आहे, आणि अधिकाधिक होत राहील. निसर्गावर विजय म्हणजे निसर्गाच्या प्रक्रियेचे अधिकाधिक सम्यक् ज्ञान आणि तदनुरूप इष्ट आचार एवढाच त्याचा अर्थ आहे. त्या अर्थाने या युद्धात मानव पराभूत होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही... परंतु विज्ञानामुळे समाजाची जीवनपद्धती बदलते, या बदलत्या समाजपद्धतीला जुन्या हितसंबंधांना हादरा बसतो, त्यामुळे समाजपरिवर्तनाला विरोध होत राहतो आणि सामाजिक क्रांतीची निकड जाणवू लागते. भारतासारख्या देशात ही गोष्ट तीव्रतेने दिसून येते...'' (पृष्ठ चौदा-पंधरा) या युक्तिवादावर हे संपूर्ण पुस्तक भर देते.

> 'टू लव्ह अँड टू थींक' (करुणा/प्रेम आणि विवेक) ही त्यांच्या एकूणच जीवनाची व चिंतनाची द्विसूत्री होती. ते ईश्वर मानत नव्हते; म्हणजे नास्तिक होते; परंतु मानवतेचे अधिष्ठान मांगल्य हे आहे असा त्यांचा विश्वास होता.

रसेल यांच्यापुढे असणारा आदर्श समाज व्यक्तिमात्राच्या आंतरिक विकासासाठी पोषक असे लोकशाही वातावरण देशात राहावे असा आग्रह धरणारा आहे तद्वतच



समाजाच्या सर्व स्तरांना विज्ञानप्रणीत भौतिक समृद्धीचा लाभ देणाराही आहे.

माणसाला समाजात उपयुक्त स्थान हवे, इतरांना अपायकारक होणार नाही अशा प्रकारे त्याच्या स्वयंप्रेरित कर्तृत्वाला वाव मिळावा आणि त्याची चूक नसताना त्याच्यावर संकटपरंपरा येऊ नये अशी तीन तत्त्वे या समाजाने पाळायला हवीत. त्यासाठी योग्य त्या जीवनमूल्यांचा स्वीकार करायला हवा. शास्त्रशुद्ध विचार, निर्भय आचार, मनुष्यमात्राविषयी प्रेम अशा मूल्यांची गरज त्यासाठी आहे असा रसेल यांच्या प्रतिपादनाचा रोख आहे.

विज्ञान आणि परंपरा, तंत्रविद्येचे सामान्य परिणाम, गटशाही आणि वैज्ञानिक तंत्रविद्या, लोकशाही आणि वैज्ञानिक तंत्रविद्या, युद्ध आणि विज्ञान, विज्ञान आणि मूल्ये, विज्ञानप्रणीत समाजरचना अशा सात प्रकरणांमध्ये रसेल यांनी आपला या संदर्भातील विचारव्यूह स्पष्ट केला आहे. रसेल यांच्या कुशाग्र, सर्वगामी आणि मूलगामी बुद्धिमत्तेचा प्रत्यय या विचारव्यूहाच्या प्रत्येक तपशीलामध्ये दिसून येतो. विविध विषयांमधील त्यांच्या आकलनाची जी खोली त्यात दिसते, ती स्तिमित करणारी असते.

'विश्वरचनेतील मानवाचे स्थान' ठरवताना रसेल म्हणतात, ''एकाच वेळी, एकाच हाताने विज्ञानाने मानवाला अत्युच्च स्थान दिले आहे तर दुसऱ्या हाताने त्याला क्षुद्रतम बनवून टाकले आहे. अमर्याद विश्वाचे चिंतन करत असताना त्याचे स्थान क्षुद्रतम बनते आणि तेच कर्तृत्वाच्या दृष्टीने विचार करता चराचर सृष्टीत त्याला सर्वोच्च स्थान मिळते... दान्तेची डिव्हाईन कॉमेडी पृथ्वीला विश्वाचे केंद्र मानते; या केंद्राभोवती एकाबाहेर एक बसणारे दहा गोल आहेत. मृत्यूनंतर पाणी लोकांना पृथ्वीच्या केंद्रस्थानी शिक्षा ठोठावण्यात येतात. पुण्यवान लोकांचे जेरुसलेमला माउंट ऑफ पर्गेटरीवर शुद्धीकरण करून पुण्यवानांना त्यांच्या पुण्यसंचयाच्या प्रमाणानुसार पृथ्वीभोवतीच्या दहा गोलांपैकी एकावर स्थान मिळते. तेथे तो जीव कायमचा राहतो. अशी कल्पना दान्तेने मांडली आहे.''

> माणसाला समाजात उपयुक्त स्थान हवे, इतरांना अपायकारक होणार नाही अशा प्रकारे त्याच्या स्वयंप्रेरित कर्तृत्वाला वाव मिळावा आणि त्याची चूक नसताना त्याच्यावर संकटपरंपरा येऊ नये अशी तीन तत्त्वे या समाजाने पाळायला हवीत.

दान्तेचे हे कल्पनारम्य रेखाटन आजच्या विज्ञानाच्या संदर्भात हास्यास्पद ठरते. पृथ्वी हे विश्वाचे केंद्र नाही. ३० हजार कोटी ताऱ्यांच्या पट्ट्यातील एक म्हणजे आपली आकाशगंगा. सूर्याचे वजन $२.१०^{१७}$ टन भरते तर आकाशगंगेचे वजन सूर्याच्या १६ हजार कोट पटीने अधिक भरते. अशा तीन कोटी आकाशगंगा शास्त्रज्ञांना ज्ञात आहेत. तेव्हा पृथ्वी हे विश्वाचे केंद्र हा डांटेचा कल्पनाविलास व्यर्थच

आहे. पृथ्वीच जेथे या आकाशगंगेत एक अत्यंत छोटी क्षुल्लक गोष्ट ठरते तेथे मानवाचे काय?

परंतु या मानवाच्या कर्तृत्वाचा विचार करताना मात्र रसेल यांना अभिमान वाटतो. विज्ञानाने निर्माण केलेले जग वेगळे आहे, आणि त्यामार्गे प्राप्त होणारी शक्ती प्रार्थनेपेक्षा कितीतरी मोठी आणि विश्वासार्ह आहे. विज्ञानपूर्व काळात ईश्वर सर्वशक्तिमान मानला जाई आणि त्याच्यापुढे लीन होणे म्हणजे आयुष्यातले क्लेश, दु:ख, संकट यापासून स्वत:ची मुक्तता करून घेणे होय. ही ईश्वराची संकल्पना मानवसदृश्य असल्याने ईश्वराला रागही पटकन येत असतो; आणि तो क्षमायाचनेने प्रार्थनेने, पूजनाने दूर होणारा असल्याने एकूण जग हे आश्वासक, उबदार आणि सुखद होते. श्रद्धेने सर्वकाही प्राप्त होते, श्रद्धा हवी यावर भर दिला जात असे... परंतु विज्ञाननिष्ठेचा स्वीकार केला तर ईश्वराला हद्‌पार केल्यावाचून गत्यंतर उरत नाही. या सृष्टीतील घडामोडींमागे काही उद्देश आहे ही कल्पनाही फोल ठरते. डार्विनच्या सिद्धान्ताने सनातनी धर्मप्रामाण्यावर आणि धर्मशास्त्रावर घाव घतला. मात्र अपरिपक्व बुद्धीने डार्विनच्या सिद्धान्तांचे चुकीचे विश्लेषण करून अठराव्या शतकातील उदारमतवादी विचारप्रणालीवर गंभीर आघात झाला; असे रसेल मानतात. ते उदारमतवाद्यांना पुढील प्रश्न विचारतात.

> एकाच वेळी, एकाच हाताने विज्ञानाने मानवाला अत्युच्च स्थान दिले आहे तर दुसऱ्या हाताने त्याला क्षुद्रतम बनवून टाकले आहे. अमर्याद विश्वाचे चिंतन करत असताना त्याचे स्थान क्षुद्रतम बनते आणि कर्तृत्वाच्या दृष्टीने विचार करता चराचर सृष्टीत त्याला सर्वोच्च स्थान मिळते...

* पिथिकॅन्थ्रॉनस (माकड व माणूस यांच्या दरम्यानची अवस्था) आज जिवंत असता तर तुम्ही त्याला मानवी हक्क बहाल कराल का? त्याला नैतिक जबाबदारीची जाणीव होती का?

* होमो पेकिनिएन्सिलसला नरकवासाची शिक्षा झाली होती का? त्याचे शिक्षण केंब्रिज विद्यापीठात झाले असते तर तो न्यूटनच्या तोडीचा शास्त्रज्ञ बनला असता का?

* पिल्टडाऊन माणूस स्वर्गाला गेला का? त्याची बुद्धी आणि जाणीव प्रगल्भ होती का?

असे प्रश्न विचारत थेट अमीबापर्यंत पोचता येईल असे सांगून सर्व माणसे जन्मत: सारखी वा समान नसतात; असामान्य व्यक्ती निर्माण करण्यात शिक्षण व आनुवंशिकता यांचाही भाग असतो; जीवशास्त्रदृष्ट्या सर्व माणसे समान नाहीत; पण राजकीय दृष्ट्या तसे मानायला हरकत नाही... विज्ञानामुळे आपली शक्ती अमर्याद वाढली असल्याची भावना माणसात निर्माण झाली आहे. परंतु विज्ञाननिष्ठेतून



भासमान होणाऱ्या मानवी सत्तेच्या तत्त्वज्ञानाचे स्वरूप मात्र महासंहारक आहे, आणि त्याच्या स्वीकार आपण करू शकत नाही असे रसेल यांचे प्रतिपादन आहे. समाजाच्या राजकीय संघटनेत, दैनंदिन जीवनात आणि अर्थव्यवहारात शास्त्रीय ज्ञान आणि त्या ज्ञानावर आधारित तंत्रविद्या यांचा प्रभाव ज्या प्रमाणात जाणवतो त्या प्रमाणात तो समाज विज्ञाननिष्ठा असे म्हणता येईल.

हा समाज स्थिर किंवा टिकाऊ असतो का असा प्रश्नही रसेल विचारतात.

त्याचे उत्तर देताना ते म्हणतात : भौतिक कारणे, जीवशास्त्राशी संबंधित कारणे आणि मानसशास्त्रीय कारणे यामुळे विज्ञानप्रणीत समाजात अस्थिरता आढळते. लोकसंख्येच्या वाढीला विज्ञानाने हातभार लागला आहे. माल्थसचा सिद्धान्त खोटा ठरला आहे. कृत्रिम खते, यंत्रसामुग्री, सुधारलेले बीबियाणे, संकरित जनावरांच्या जाती, दळणवळणाच्या जलद साधनांमुळे अन्नधान्याची आणि औद्योगिक उत्पादनांची होणारी आयात-निर्यात, या सर्वांमुळे एकीकडे स्थैर्य वाढत आहे पण दुसरीकडे अस्थिरताही वाढीला लागत आहे. पाश्चात्य देशांमध्ये लोकसंख्येच्या वाढीला आळा बसला आहे तर भारतामध्ये तिच्या वाढीचा वेग प्रचंड आहे. चीनने एक दांपत्य - एक मूल हे धोरण शबवून लोकसंख्या रोखण्याचा कार्यक्रम राबवला आहे. एका देशाने लोकसंख्या वाढू देणे व इतरांनी ती रोखून धरणे या धोरणातून लोकसंख्येचा प्रश्न सुटणार नाही. जगातील सर्वच देशांनी त्याबाबत एकच धोरण राबवायला हवे असे रसेल यांचे मत आहे.

> जीवशास्त्रदृष्ट्या सर्व माणसे समान नाहीत; पण राजकीय दृष्ट्या तसे मानायला हरकत नाही... विज्ञानामुळे आपली शक्ती अमर्याद वाढली असल्याची भावना माणसात निर्माण झाली आहे. परंतु विज्ञाननिष्ठेतून भासमान होणाऱ्या मानवी सत्तेच्या तत्त्वज्ञानाचे स्वरूप मात्र महासंहारक आहे,

या मताचे राजकीय प्रात्यक्षिक रूप म्हणजे विश्वराज्याची प्रस्थापना.

घाईघाईने काढलेला हा निष्कर्ष नाही असे रसेल म्हणतात.

लोकसंख्येवर अंकुश ठेवण्याबाबत चालढकल करणारे देश हे लोकसंख्या नियंत्रित ठेवणाऱ्या देशांना कालान्तराने डोईजड ठरतील आणि त्यांच्यात अधूनमधून युद्धे होत राहतील. युद्धात जिंकणारा देश ठरलेल्या देशाच्या अन्नपुरवठ्यात कपात करील - असा पन्नास वर्षांपूर्वीचा रसेल यांचा अंदाज होता. अन्न उत्पादन आणि पुरवठा हा एक निकष त्यांनी त्यावेळी केंद्रवर्ती मानला होता. त्याचबरोबर रसेल यांना आजच्या राजकारणाला. उन्माद आणि नि:सत्त्व दीनवाणेपणा हे दोन मानसिक विकार जडलेले आहेत असे वाटत होते. नि:सत्त्व अगतिक देश आपल्यावरील अरिष्टाचा प्रतिकार वेळीच करण्याबाबत गाफील राहतात, कष्टप्रद, साहसी कामे करण्यात मागे

राहतात; अनैसर्गिक मानसिक तणावाखाली राहतात. त्यावेळच्या साम्यवादी रशियात हा ताण फार प्रचंड प्रमाणात जाणवे असे त्यांचे मत होते.

''आजच्या अमेरिकेइतकी सुबत्ता सगळ्या जगात निर्माण करता आली तर विज्ञानप्रणीत समाजाचे स्थैर्य लोकसंख्येच्या वाढीच्या प्रश्नाने बिघडण्याचे भय उरणार नाही'' असेही रसेल म्हणतात.

'संततिनियमनाचा पुरस्कार व अंगीकार न करताच आशियाई राष्ट्रांना संपन्न व्हावयाचे असेल तर पाश्चिमात्य राष्ट्रांचा पराभव करून, पाश्चिमात्य देशातील बहुसंख्य लोकांची कत्तल करून, त्यांचे देश आशियाई लोकांना खुले करावे लागतील.'' असा इशारा रसेल यांनी दिला होता. (१२४) त्यांचा इशारा आज काही अंशी प्रत्यक्षात खरा ठरला आहे; कत्तली न करताही पाश्चात्य देशातील घटत्या लोकसंख्येमुळे तेथे आवश्यक त्या सेवासुविधा पुरवण्यासाठी आशियाई लोकांना प्रवेश देणे त्यांना अपरिहार्य ठरले आहे.

संततिनियमनाचा पुरस्कार व अंगीकार न करताच आशियाई राष्ट्रांना संपन्न व्हावयाचे असेल तर पाश्चिमात्य राष्ट्रांचा पराभव करून, पाश्चिमात्य देशातील बहुसंख्य लोकांची कत्तल करून, त्यांचे देश आशियाई लोकांना खुले करावे लागतील.

स्थैर्यासाठी आर्थिक संपन्नतेची उच्च पातळी आवश्यक आहे.

सीमित लोकसंख्या आणि उत्पादनासाठी तंत्रविद्येचे साहाय्य असेल तर सुखाचे साहसी मार्ग सर्वांना खुले होऊ शकतील. संघराज्य पद्धतीचा विस्तार, सत्तेचे विकेंद्रीकरण आणि स्थानिक संस्थांना स्वायत्तता या तीन सुधारणांची त्यासाठी गरज आहे असे त्यांचे प्रतिपादन आहे.

रसेल यांनी त्यासाठी सैन्यदले व शस्त्रास्त्रे यांची मक्तेदारी असलेले आणि म्हणून जगात शांतता सुरक्षित राखू शकणारे विश्वराज्य स्थापन करण्याची कल्पना मांडली आहे. जगात सुबत्तेबाबत समानता असावी; त्यामुळे एक प्रदेशाला दुसऱ्या प्रदेशाचा हेवा वाटू नये, लोकसंख्या आहे त्या आकड्यावर प्राय: स्थिर राहावी, वैयक्तिक स्वयंकर्तृत्वाला काम आणि छंद या दोन्ही क्षेत्रात वाव असावा अशी पथ्ये त्यासाठी इष्ट व अटळ ठरतात. युद्ध व दारिद्र्य या संकटांचे भय नसलेला, सर्वनाशाच्या भयापासून मुक्त झालेला माणूस हा खरा मुक्त माणूस होय. अशा माणसांचा समाज हा खरा मुक्त समाज होय.

रसेल यांच्या या विचारव्यूहाचे वेगवेगळे पैलू मूळ पुस्तकातील सविस्तर विवेचनाद्वारे समजावून घ्यायला हवेत. त्यामुळे सद्य:कालातील समस्यांकडे पाहण्याचे सम्यक् भान आपणांस येऊ शकेल. हे पुस्तक म्हणजे एक बौद्धिक मेजवानीच होय.

**पृष्ठे :१४४● किंमत :१००रु. ● सभासदांना :७५रु. ● पोस्टेज : २०रु.**



# रंगीत चित्रांच्या मजेदार कथांची सहा पुस्तके

**पिढ्यानुपिढ्या मौखिक परंपरेने समाजावर नीतिधर्माचा संस्कार करणाऱ्या लोकविलक्षण बालकथांचे जग**




एक बढाईखोर गिरणीवाला एका राजाला सांगतो, ''माझी मुलगी गवताचं सोनं करू शकते.''

- आता असं कोणी म्हटलं तर 'मग दाखव तर गवताचं सोनं करून' असंच राजा सांगणार, नाही का?

'टिंबक टू' गोष्टीतला राजाही तसेच सांगतो; आणि त्या मुलीला राजवाड्यातल्या एका दालनात गवताचे भारे देऊन त्याचे सोने करायला राजा सांगतो.

पण गिरणीवाल्याची मग मोठीच गोची होते.

का?

तर त्याने ती चक्क थाप मारलेली असते.

आता काय होणार असा प्रश्न तुम्हांला पडेल, नाही का?

परीकथांमध्ये अशा लोकविलक्षण कल्पना सर्रास येतात आणि त्याद्वारे वाचकांची, श्रोत्यांची उत्सुकता वाढवली जाते. बढाईखोर गिरणीवाल्याची मुलगी बिचारी त्या गवताच्या भाऱ्यांकडे बघत बसून राजाचा राग ओढवून घेणार - असेच आपल्याला प्रथम वाटते.

आपण त्या मुलीच्या जागी असतो तर आपली काय अवस्था झाली असती? आपण या पेचप्रसंगातून कसा मार्ग काढला असता?

... पण आपल्याला पडणारे हे प्रश्न परीकथाकार सहज सोडवून टाकतात.

परीकथेत जादू चालते. जे व्यवहारात शक्य नाही ते जादूच्या आधारे सहज साधता येते. जादूने कुठल्याही वस्तूचे कशातही रूपांतर करता येते. मग गवताच्या भाऱ्याचे रूपांतर सोन्याच्या लगडीत होणे अवघड का वाटावे?

- पण हे करायचे तर जादू येणारा कोणीतरी आपल्या मदतीला यायला हवा.

नाही का?

असा तो जादूगार आपल्याला कसा भेटणार?

परीकथेत हे देखील सहज जमू शकते. गिरणीवाल्याच्या मुलीला गवताचे सोन्यात रूपांतर करणारा जादूगार भेटू शकतो. भेटतो. नव्हे, तोच तिला शोधत येतो.

**परीकथेच्या जगात चांगल्या माणसांच्या मदतीला सगळेजण आपण होऊन धावून येतात. निसर्ग साथ देतो. पंचमहाभूते मदतीला येतात. अतींद्रिय शक्ती असलेल्या व्यक्तीही सहाय्य करतात. सद्‌गुणी माणसांना मदत करायला, त्यांच्या इच्छा पूर्ण करायला सगळेजण साथ देत असतात. देत राहतात. दुष्ट शक्तींना धडा शिकवण्याचाही त्यांचा इरादा असतो.**

मग आता गवताचे सोन्यात रूपात करणारा जादूगार त्या गिरणीवाल्या मुलीला आपण होऊन भेटायला यायलाच हवा. नाही का?




तो जादूगार येतो तो एका बुटक्याच्या रूपात. तो त्या गिरणीवाल्याच्या मुलीला म्हणतो,"मी तुला मदत करू शकेन. गवताचे सोने करून देईन."

पण तो हे काम करण्यासाठी काहीतरी अट घालणारच. फुकटात कुठले काम कोणी केले तर त्याची किंमत काय उरणार?

हा बुटका जादूगार काय अट घालतो?

"तुझ्या गळ्यातली चमचमती माळ मला दे. तर मी सकाळपर्यंत या सगळ्या गवताचं सोनं करून देईन."

आता बुटक्याची ही अट मान्य करायलाच हवी, नाही का?

तर ती मुलगी ती अट मान्य करते.

बुटका आपले काम चोख करतो; आणि माळ घेऊन निघून जातो.

सकाळी राजा त्या दालनात येतो आणि सोन्याच्या लगडी बघून खूष होतो.

वाचकहो,

तुम्हांलाही त्यामुळे हायसे वाटले असणार. गरीब बिचाऱ्या मुलीची शिक्षा टळली म्हणून!

पण परीकथा एवढेच सांगून संपत नाही. परीकथा हा वाङ्मयप्रकार शेकडो वर्षे विकसित होत राहिला आहे; तो एकातून एक अशा अनेक कथांची सांगड घालून, वाचकांना, श्रोत्यांना सारखा आश्चर्याचे धक्के देत राहण्यात मजा मानतो. त्यामुळे राजाच्या आज्ञेप्रमाणे गवताचे सोने करून झाले; आता गोष्ट संपली असे काही हो



नाही. तुमची उत्सुकता आणखी वाढायला हवी; म्हणून कथानकात आणखी रंग भरायला हवा. पेच आणायला हवा.

अनायासे भरपूर सोन्याची प्राप्ती झालेल्या राजालाही हाव सुटते; शेवटी मानवी स्वभावच तो! त्यामुळे आणखी जास्त सोने मिळवण्यासाठी तो दुसरी अट घालतो. "तू काहीतरी लबाडी केली असणार... गवताचे कधी सोने होते का? तू दुसरीकडून सोने आणले असणार. मी असा फसणार नाही आज रात्री मी तुला नवीन गवत देतो. त्याचे सोने करून दाखव. बाहेरून तू कोणाला मदतीला बोलवू नकोस. त्यासाठी मी ही खोली बाहेरून बंद करतो."

वाचकहो, आता आपल्याला वाटणार की गिरणीवाली मुलगी आता नक्कीच राजाच्या शिक्षेला पात्र ठरणार. दारे खिडक्या बंद म्हटल्यावर तो बुटका कसा त्या दालनात येऊ शकणार? झाले. बिचारी नाहक मरणार.

या विचाराने आपण मनातल्या मनात नक्कीच हळहळणार.

पण परीकथेत अद्‌भुत प्रकार सहजपणे घडत असतात. स्थलकालावर मात करण्यात जादू कधी कमी पडत नाही.

परीकथा हा वाङ्मयप्रकार शेकडो वर्षे विकसित होत राहिला आहे; तो एकातून एक अशा अनेक कथांची सांगड घालून, वाचकांना, श्रोत्यांना सारखा आश्चर्याचे धक्के देत राहण्यात मजा मानतो. त्यामुळे राजाच्या आज्ञेप्रमाणे गवताचे सोने करून झाले;

दारे खिडक्या बंद असूनही सूक्ष्म देह धारण करून तो बुटका जादूगार गिरणीवाल्या मुलीकडे येऊन उभा ठाकतो; आणि म्हणतो, "मी कालच्या प्रमाणेच आजही तुझे काम करून देतो. पण आज मला तुझी अंगठी हवीय."

- आता ती या मागणीला नकार कसा देणार?

शक्यच नाही.

तर बुटका जादूगार त्या मुलीला पुन्हा वाचवतो.

आता गोष्ट संपायला हवी, नाही का?

पण नाही, परीकथांमध्ये कुठल्याही बाबतीत किमान तीन अटी असाव्यात असा संकेत दिसतो.

पहिल्यांदा गोष्ट घडते ती अपघाताने; दुसऱ्यांदा तसेच झाले तर ते योगायोगाने. तिसऱ्यांदा मात्र तसे काही घडायचे तर त्यात तुमचे कौशल्य दिसते. प्रावीण्य दिसते. तुमचा अभ्यास दिसतो. तुमची शक्ती दिसते.

तेव्हा राजा तिसऱ्या दिवशीही त्या मुलीला आणखीनच जास्त गवताचे भारे देऊन सोने करायला सांगतो; आणि तसे केलेस तर राजपुत्राशी तुझे लग्न करून देईन

असेही आश्वासन देतो.

वाचकहो, आता पुन्हा तो बुटका जादूगार येणार आणि ते काम करून देणार ही तुमची अपेक्षा असणार. ती बरोबरही ठरणार. प्रश्न एवढाच की तो बुटका अट काय घालणार? काय मागणार? पहिल्या दिवशी मुलीच्या गळ्यातली चमचमती माळ त्याने मागितली. दुसऱ्या दिवशी तिच्या बोटातली अंगठी. आता त्याला काय हवे असणार?

-आणि तिथे तुम्हाला आश्चर्यचकित करण्याची संधी परीकथाकार घेतो. तुमच्या ध्यानीमनी नसेल अशी काहीतरी गोष्ट तो मागणार.

-तर तिसऱ्या दिवशी तो बुटका तिच्याकडे काय मागतो?

''जर तू राजपुत्राची बायको झालीस तर तुझं पहिलं मूल मला द्यायला हवं.'' मूल ही भविष्यकालीन गोष्ट - आपल्याला तिचे काही विशेष जाणवत नाही. ती मुलगीही चटकन हो म्हणून जाते.




ठरल्याप्रमाणे बुटका जादूगार तिसऱ्या दिवशीही आपले गवताचे सोन्यात रूपांतर करण्याचे काम करतो. त्या मुलीचे राजपुत्राशी लग्न लागते.

राजाराणी, गिरणीवाला, राजपुत्र - गिरणीवाल्याची मुलगी सर्वजण खूष होतात. सर्वत्र आनंदी आनंद होतो.

कथा संपली असे आपणाला वाटते. पण परीकथा अशी संपत नाही. ती काहीतरी पुढच्या घटनाक्रमांची मेख मारून आपली उत्सुकता ताणत राहते.

काही दिवस जातात. राणीला मूल होते आणि तो जादूगार राणीकडे येऊन आपल्या तिसऱ्या अटीची आठवण देतो. तू मला वचन दिलं होतंस. तुझं बाळ मला देण्याचं तू मान्य केलं होतंस. ते न्यायला मी आलोय.''

ती घाबरते. गयावया करते. म्हणते, ''असं काय रे करतोस? माझं बाळ नको नेऊस. तुला पाहिजे तर द्रव्य देते. दागिने देते...''

तो नकार देतो. ''मला तुझे बाळच हवे.''

पण आता तो जर आपल्या या मागणीवर ठाम राहिला तर कथाच संपणार.

परीकथा अशा आडमुठ्या माणसांच्या आडमुठेपणाने थबकत नाही. ती पेचप्रसंगातून सुटकेचा मार्ग ठेवते. तो जादूगार म्हणतो, ''एका अटीवर मी बाळ तुझ्याकडेच राहू देईन.''

''काय आहे तुझी अट.''



''माझे नाव ओळखून दाखव. त्यासाठी तीन दिवसाची मुदत तुला देतो.''

- आता तिला त्याचे नाव कसे कळणार?

परीकथाकार त्याबाबतीतही सुटकेचा मार्ग ठेवतो.

तो जादूगार रात्री बागेत नाचतबागडत राहतो. कसं पेचात धरलंय राजकन्येला? तिला आपलं नाव कळणार नाही. आता मूल आपलंच या खुशीत तो असतो. ही खुशी व्यक्त करताना, आपल्याच विजयाच्या धुंदीत असताना तो गाणं गात राहतो, ''माझं नाव तुला कसं कळणार? टिंबकटूलाच तुझं बाळं मिळणार.''

-आपल्यावरच खुश असणारी माणसं आपल्याच विनाशाला कारण ठरत असतात.... राणी ते त्याचे गाणे ऐकते - आणि जादूगाराला त्याचे नाव सांगून, त्याला निरुत्तर करते... जादूगाराला आपली हार मान्य करावी लागते...

गोष्ट संपते.

अशा परीकथा - लोककथा पिढ्यानुपिढ्या देशादेशात मौखिक परंपरेने समाजाच्या जाणिवेचा भाग बनून राहताना दिसतात.




स्थलकालानुसार त्यातले तपशील बदलतात. काही प्रसंग वेगळे येतात. परंतु कथेचा मूळ गाभा बराचसा टिकून राहतो. त्यातून मिळणारा संदेश, त्यांच्यातील अंत:सूत्र कायम राहते. ते मानवी जीवनातील काहीतरी महत्त्वाचे सूत्र अधोरेखित करणारे असते.

बालकथांच्या पुस्तकातून अशा पारंपरिक कथांची पुनर्निवेदने सातत्याने भेटत राहतात; आणि बालमनावर ती आपली अमिट छाप संवेदनाक्षम वयात कळत-नकळत सोडून जातात.

मुलांना तसेच मोठ्यांनाही अशा कथा खिळवून ठेवतात. त्यांच्या त्यांच्या पातळीवर रंजक वाटतात; त्याचप्रमाणे जीवनाकडे बघण्याचीही दृष्टी देतात. बालसाहित्य हे मुलांना मुलांच्या पातळीवर आवाहन करते, आणि प्रौढांना प्रौढांच्या पातळीवर... त्यांतून मिळणारा संदेश हा त्या त्या वयातही आपल्याला काही विशेष वास्तवाची जाणीव देणारा असतो. त्याचमुळे त्या कथांचा आशय बहुपेडी होतो. अनेक शक्यता दाखवतो. अनेक आशयसूत्रे त्याद्वारे प्रकट होत राहतात.

टिंबकटू या पुस्तकातील तीन बोकड, लांडगा आला रे जादूचा वेल या कथा अशाच जागतिक परीकथांच्या परंपरेतून आलेल्या आहेत. 'छकुली आणि ककुली'मध्ये तहान लागलेल्या कावळ्याने उंच सुरईत दगड टाकून पाण्याची पातळी वर आणून आपली तहान भागवली ही चिरपरिचित गोष्ट वेगळ्या रूपात समोर येते.

बालसाहित्य हे विश्वसाहित्य आहे; ते जीवनाचे वास्तवाचे, स्वभावाचे वेगवेगळे रंग उलगडून दाखवते. वेगवेगळ्या समस्यांकडे लक्ष वेधते. त्यातून सुटकेचे वेगवेगळे पर्यायही समोर ठेवते. म्हणूनच पालकांनी मुलींच्या हाती बालसाहित्य देण्याचा कटाक्ष बाळगला पाहिजे. मुलांच्या भावनिक, सामाजिक, बौद्धिक, मूल्यात्मक जाणिवांना त्यामुळे चालना मिळेल.

## परीकथांचा रंगीबेरंगी खजिना

मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे रंगीबेरंगी चित्रांनी सजलेली बहुरंगी छपाई असणारी बालकथांची पुस्तके मोठ्या प्रमाणावर प्रकाशित करण्याची योजना राबवली जात आहे. त्यातील सहा पुस्तकांचा पहिला संच नुकताच बाजारात आला आहे. परंपरेने चालत आलेल्या हॅन्स अंडरसन, ग्रिम बंधू यांच्या परीकथांवर आधारित कथांचा त्यात समावेश आहे. परदेशी कथांना भारतीय परिवेशही शक्य तेथे चढवण्यात आला आहे. कोठेकोठे मूळ व्यक्तिनामे आणि वातावरण तसेच ठेवण्यात आले आहे. देवीदास पेशवे आणि चंद्रशेखर जोशी यांनी मुखपृष्ठे आणि रंगीत कथाचित्रे याद्वारे ही पुस्तके आकर्षक व्हावीत अशी दक्षता घेतली आहे. हा संपूर्ण संच ७ ते १० वयोगटातील मुलांना समोर ठेवून तयार करण्यात आला आहे. पालकांनी तो मुलांना वाढदिवशी वा अन्य प्रसंगी भेट देऊन मुलांमधील वाचनाची गोडी वाढवण्यास हातभार लावावा.

बालसाहित्य हे विश्वसाहित्य आहे; ते जीवनाचे वास्तवाचे, स्वभावाचे वेगवेगळे रंग उलगडून दाखवते. वेगवेगळ्या समस्यांकडे लक्ष वेधते. त्यातून सुटकेचे वेगवेगळे पर्यायही समोर ठेवते. म्हणूनच पालकांनी मुलींच्या हाती बालसाहित्य देण्याचा कटाक्ष बाळगला पाहिजे.

**१. नशीबवान शेखर** (डॉ. वृषाली पटवर्धन) यातील कथा

१. राधारघूची युक्ती, चेटकिणीची सुट्टी

२. हिरवा जादूगार आणि चलाख चतुरा

३. बिच्चारं आमलेट (डुकराच्या तोंडात)

४. नशीबवान शेखर (ड्युक वेलिंग्टन आणि त्याचे मांजर)

**२. चतुर बोकोबा** (डॉ. वृषाली पटवर्धन) या पुस्तकातील कथा.

१. चतुर बोकोबा

२. धूर्त करकोचा आणि हुशार खेकडा

३. लबाड कोल्हा आणि लाल कोंबडा

४. चतुर चंदर (कबुतर) (जाळ्यात अडकलेल्या कबुतरांची उंदराकडून सुटका)






**३. निद्राराणी आणि इतर कथा** (विजया देशपांडे) या पुस्तकातील कथा

१. कुरूप पिल्लू (अग्ली डकलिंग),

२. मत्स्यकन्या (दि लिटल मरमेड)

३. निद्राराणी (स्लीपिंग ब्युटी)

४. राजाचा नावीन्यपूर्ण पोशाख (एम्परर्स न्यू क्लोद्‌ज्)

**४. जादूचं खीरपात्र** (अरुंधती पंडित) या पुस्तकातील कथा

१. सिंह आणि ससा

२. जादूचं खीरपात्र

३. बोलणारी गुहा

४. माकडं आणि मगर

**५. सुंठ-बिस्किटाचा माणूस**(चारुता पुराणिक) या पुस्तकातील कथा

१. सुंठ बिस्किटाचा माणूस


२. तीन चिमुकली पिले

३. राजकन्या आणि शेंगेचे बी

४. अवाढव्य नवलकोल

५. रत्ना

६. बूटचप्पलवाला आणि बुटके




**६. टिंबक टू आणि इतर कथा** (मंजूषा आमडेकर)

१. बाळू आणि घेवड्याचा वेल

२. छकुली आणि ककुली

३. तीन बोकडांची गोष्ट

४. पीटर आणि लांडगा

५. टिंबक टू

**किंमत : ३० रु. प्रत्येकी ● सभासदांना : २३ रु. प्रत्येकी**

**● पोस्टेज : २० रु. प्रत्येकी संपूर्ण संचास २५ रु.**




*** महाराष्ट्रभूषण डॉ. माशेलकर**

''आगामी सहस्रक विज्ञानाचे आहे. त्यामुळे ज्ञानेश्वरांच्या वारशाकडून 'विज्ञाने'श्वराकडे जाणे क्रमप्राप्त आहे. मात्र, मन आणि मानसिकता यांच्यातील द्वंद्वामुळे आपण मागे खेचले जात आहोत,'' अशी खंत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्यक्त केली.

राज्य सरकारच्या वतीने देण्यात येणारा 'महाराष्ट्र भूषण'पुरस्कार डॉ. माशेलकर यांना मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पाच लाख रुपये, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या कार्यक्रमास सांस्कृतिक कार्यमंत्री अशोक चव्हाण, सांस्कृतिक विभागाच्या सचिव संजीवनी कुट्टी, सांस्कृतिक कार्य संचालक भास्कर धाटावकर, डॉ. माशेलकर यांच्या मातु:श्री अंजनीबाई आणि पत्नी वैशाली आदी उपस्थित होते.

डॉ. माशेलकर म्हणाले, ''आतापर्यंत अनेक पुरस्कार मिळाले; परंतु हा पुरस्कार आईने दिलेल्या पुरस्काराएवढा मोठा आहे. मी महापालिकेच्या शाळेतून मराठी माध्यमातून शिकलो. परदेशात जाण्याऐवजी भारतातच पीएच.डी.पूर्ण केली, संशोधन केले, याचा मला अभिमान आहे. मराठीतून शिक्षण घेतल्याने कोणाचेही वाईट झालेले नाही. मराठी ही राजभाषा झाली; मात्र ती ज्ञानभाषा होणे अत्यंत गरजेचे आहे.''

डॉ. माशेलकर यांच्यासारख्या संशोधकाला 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार दिल्याने या पुरस्काराची उंची वाढली आहे. त्यांच्यासारखी व्यक्ती 'विश्वभूषण पुरस्कारा'च्या पात्रतेची आहे, असे मुख्यमंत्री विलासराव देशमुख म्हणाले.

*** अमिताभ बच्चन यांना दीनानाथ पुरस्कार**

मा. दीनानाथ स्मृती प्रतिष्ठानने मला पुरस्कारयोग्य मानून लताजींच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केल्याने मी धन्य झालो आहे. हा पुरस्कार म्हणजे मी माझा मोठाच बहुमान समजतो. आपले आई-वडील हे आपले जीवनस्रोत असतात. त्यांच्या वात्सल्याच्या पाठबळावरच आपण जीवनात काहीएक करून दाखविण्याचा प्रयत्न करत असतो... आयुष्यात काही प्राप्त करत असतो. म्हणूनच आपल्या महान वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मंगेशकर कुटुंबियांनी ठेवलेल्या या पुरस्काराच्या रूपाने जणू मला त्यांचा आशीर्वादच लाभला आहे असे मी मानतो, असे कृतज्ञतापूर्ण उद्‌गार हिंदी चित्रपटसृष्टीचे अनभिषिक्त सम्राट अमिताभ बच्चन यांनी काढले.

षण्मुखानंद सभागृहात आयोजित केलेल्या मा. दीनानाथांच्या ६३ व्या स्मृति-सोहळ्यात कला, साहित्य, संस्कृती तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांचा लता मंगेशकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. आपल्याला पुरस्काररूपात मिळालेले ५० हजार रुपये मा. दीनानाथ प्रतिष्ठानला त्यांच्या समाजोपयोगी कार्यांसाठी विनम्रतापूर्वक आपण परत देत असल्याचे अमिताभ बच्चन यांनी जाहीर केले.

संगीत क्षेत्रातील प्रदीर्घ सेवेबद्दल प्रख्यात संतूरवादक पं. शिवकुमार शर्मा, बुजुर्ग गायक कलावंत मन्ना डे, दुर्गम आदिवासी भागात आरोग्य व सामाजिक कार्याला वाहून घेतलेले डॉ. अभय बंग, मराठी विनोदी वाङ्मयात बहुमोल भर घालणारे कथाकार द. मा. मिरासदार, तसेच 'आसू आणि हसू' या नाटकाच्या सर्वोत्कृष्ट निर्मितीबद्दल 'चंद्रलेखा' संस्थेचे मोहन वाघ यांना दीनानाथ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या प्रत्येकाशी असलेल्या आपल्या ऋणानुबंधांना लतादीदींनी उजाळा दिला. पं. शिवकुमार शर्मा आणि मन्नादांबरोबरच्या सांगीतिक प्रवासाबरोबरच अमिताभसारख्या महान कलावंताच्या स्वभावातील ऋजुतेबद्दल, त्यांचे पिताजी कविश्रेष्ठ हरिवंशराय बच्चन यांच्या कवितांबद्दल तसेच द. मा. मिरासदारांच्या निखळ, इरसाल विनोदाबद्दल लतादीदी भरभरून बोलल्या.

*** 'जलपर्व' कादंबरीस सिंचन सहयोग पुरस्कार**

सिंचन क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती तसेच या क्षेत्रात लेखन करणाऱ्या व्यक्तींना महाराष्ट्र सिंचन सहयोगतर्फे पुरस्कार देण्यात येतात. सौ. रेखा बैजल यांच्या 'जलपर्व' या कादंबरीस यंदाचा सिंचन सहयोग पुरस्कार महाराष्ट्राचे कृषिमंत्री ना. बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते महाराष्ट्र सिंचन परिषदेच्या उद्‌घाटन सोहळ्यामध्ये प्रदान करण्यात आला. सहा हजार रुपये रोख व प्रशस्तिपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सौ. रेखा बैजल यांच्या 'जलपर्व' या कादंबरीचा विषय पाणीप्रश्न व नद्याजोड प्रकल्प असा असून प्रसिद्ध जलतज्ज्ञ श्री. माधवराव चितळे यांनी या कादंबरीस प्रस्तावना दिली आहे.

*** मराठी माध्यम रत्न पुरस्कार**

मराठी भाषा टिकवण्याची इच्छाशक्ती पत्रकार, विद्यापीठातील विद्वान आणि सरकार कोणाकडेच नाही. त्यामुळे भाषेचा ऱ्हास होत असून ती जोपासण्यासाठी सर्वांगीण पातळीवर प्रयत्न होण्याची गरज ज्येष्ठ पत्रकार अरुण साधू यांनी व्यक्त केली.

मराठी भाषा संवर्धन प्रतिष्ठानच्या 'मराठी माध्यम-रत्न' पुरस्कारांचे वितरण त्यांच्या हस्ते झाल्यावर ते बोलत होते. ज्येष्ठ पत्रकार गोपाळराव पटवर्धन, वा. दा. रानडे, अरविंद गोखले आणि नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे यांना 'माध्यम-रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

माध्यमांच्या बदलत्या स्वरूपामध्ये नीतिमत्तेला तिलांजली देण्यात आली

असली, तरीही भाषेबद्दल प्रकर्षाने विचार करण्याची आवश्यकता आहे. मराठी वाचवायची कशी, याबाबत आघाडीच्या वृत्तपत्र संपादकांनी एकत्रित येऊन ठोस पावले उचलावीत. वृत्तपत्रांप्रमाणेच विद्यापीठातील विद्वान आणि सरकारनेही त्यासाठी उपाय योजले पाहिजेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. स्वत:च्या मातृभाषेत बोलण्याची लाज वाटणाऱ्यांना त्याबद्दल प्रेम आणि आपुलकी वाटणार नाहीच. त्यामुळे मराठीच्या संवर्धन आणि संरक्षणाकरता भाषेविषयी बांधिलकी निर्माण झाली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. लोकशाही, प्रशासन, कायदा आणि सुव्यवस्था याबद्दल समाजात दरी निर्माण होत असताना लोकहिताचे प्रश्न निर्भीडपणे मांडण्यासाठी सध्याच्या पत्रकारांनी जागरूक राहण्याची गरज आहे असे गोपाळराव पटवर्धन यांनी प्रतिपादन केले.

*** 'मराठीतील वृत्तसेवा संस्था सुरू करण्यात यावी'**

''गुणवत्ता आणि प्रसार या दोन्ही दृष्टीने मराठी पत्रकारितेचा विकास व्हावा व ग्रामीण क्षेत्रात ते लोकशिक्षणाचे एक साधन व्हावे, यासाठी महाराष्ट्रातील घडामोडींचे विवेचन करणारी मराठीतील 'महाराष्ट्र वृत्तसेवा' सुरू करण्यात यावी,'' असे ही गोपाळराव पटवर्धन यांनी सांगितले.

वृत्तपत्रांना बहुतांश बातम्या या पीटीआय, यूएनआय सारख्या वृत्तसंस्थांकडून मिळतात. या बातम्यांचे भाषांतर करणे हा मराठी वृत्तपत्रांतील कामाचा फार मोठा भाग असतो. या बातम्या त्यांच्या मुख्य केंद्रांतूनच मराठीत भाषांतरित होऊन आल्या तर पत्रकारांना स्थानिक महत्त्वाच्या बातम्या मिळविण्यासाठी आपले श्रम व कल्पकता वापरता येईल. त्यामुळे ग्रामीण भागातही चांगली वृत्तपत्रे सुरू होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

समाजातल्या विविध थरांतील बातम्या निर्भीडपणे मांडण्याची बातमीदारांची जबाबदारी वाढली आहे. पत्रकारितेत निर्माण झालेलं शंकास्पद वातावरण हे समाजातील परिस्थितीचे फलित आहे, हे समर्थन लंगडे आहे. आज लोकशाही, जबाबदार प्रशासन, कायदा आणि सुव्यवस्था दिवसेंदिवस कमकुवत होत चालल्या आहेत, अशा परिस्थितीत लोकांनी व पत्रकारांनी आपापल्या आणि परस्परांच्या हक्कांसाठी जागरूक राहण्याचीच गरज आहे, असेही त्यांनी सुचवले.

*** राही भिडे, मिलिंद संगई यांना वरुणराज भिडे पुरस्कार**

वरुणराज भिडे यांच्या स्मृत्यर्थ दिला जाणारा पत्रकारिता पुरस्कार यंदा लोकमतच्या मुंबईतील विशेष प्रतिनिधी राही भिडे आणि बारामती सकाळचे वार्ताहर मिलिंद संगई यांना देण्यात आला. पत्रकार वरुणराज भिडे मित्रमंडळातर्फे गेल्या चार वर्षांपासून हा पुरस्कार दिला जात आहे.

राही भिडे यांना पत्रकारितेमधील कामगिरीबद्दल ११ हजार रुपयांचा आणि ग्रामीण भागातील उदयोन्मुख पत्रकार म्हणून संगई यांना पाच हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात आला. पुणे विद्यापीठाच्या पदविका अभ्यासक्रमामध्ये प्रथम आलेल्या



अनघा सावंत आणि 'चालू घडामोडी' या विषयामध्ये सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या सीमा चोरडिया, नितीन गामणे, उल्हास कदम, मनोज पाटणकर, अमृता पटवर्धन आणि देवेंद्र सूर्यवंशी या विद्यार्थ्यांनाही पारितोषिके देण्यात आली.

*** डॉ. पठाण यांना संतमित्र पुरस्कार**

वीरशैव, जैन, सुफी या अन्य धर्मसंप्रदायांचा मराठी वाङ्मयात फारसा विचार झालेला नाही. संशोधनाच्या माध्यमातून विद्यापीठांनी, त्याकडे लक्ष दिले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. यु. म. पठाण यांनी केले.

स्नेहवर्धन प्रकाशनाच्या वतीने डॉ. प्र. न. जोशी यांच्या 'रत्नजडित ज्ञानेश्वरी' आणि डॉ. विजया संगवई यांच्या 'मुक्ताईचे योगदर्शन' या पुस्तकाचे प्रकाशन एमआयटी विश्वशांती केंद्राचे अध्यक्ष प्रा. विश्वनाथ कराड यांच्या हस्ते झाले. भारतीय विद्या भवनचे अध्यक्ष लेफ्टनंट जनरल निवृत्त वाय. डी. सहस्रबुद्धे यांच्या हस्ते डॉ. यु. म. पठाण यांच्या 'मध्ययुगीन संतसाहित्य काही आयाम' या पुस्तकास डॉ. प्र. न. जोशी संतमित्र पुरस्कार, डॉ. अनिलराज जगदाळे यांच्या 'पेटणारे पाणी' या पुस्तकास डॉ. प्र. न. जोशी विज्ञानमित्र पुरस्कार, माधव गोडबोले यांच्या 'नवी आव्हाने, कालबाह्य मानसिकता' या पुस्तकास डॉ. वि. भि. कोलते समीक्षामित्र पुरस्कार आणि इंदुमती पारीख यांच्या 'समाजविकासासाठी व्यक्तिविकास' या पुस्तकास संजीवनी मराठे साहित्य सखी पुरस्कार प्रदान करण्यात आले.

वीरशैव, जैन, सूफी धर्मचिंतनाचा विचार होत नाही. असा मोठा प्रवाह बाजूला राहिला तर मध्ययुगीन संतसाहित्याच्या अंत:सूत्री दुर्लक्षित राहतील, असे सांगून डॉ. पठाण म्हणाले की, विद्यापीठाने हा अभ्यास हाती घेतला पाहिजे. अशा खर्चिक प्रकल्पाचे नियोजन करून केलेले संशोधन ग्रंथरूपाने येणे आवश्यक आहे, या धर्मचिंतनातील प्रतिभा आणि उर्जेकडे वळायला हवे. संतसाहित्यात मोठे तत्त्वज्ञान सामावलेले आहे, असे प्रा. विश्वनाथ कराड यांनी सांगितले. स्नेहवर्धन प्रकाशनच्या डॉ. स्नेहल तावरे यांनी प्रास्ताविक केले.

*** यशवंतराव गडाख यांना नरुभाऊ लिमये पुरस्कार**

महाराष्ट्र सहकारी मुद्रणालयाच्या वतीने देण्यात येणाऱ्या नरुभाऊ लिमये स्मृती-आर्यभूषण पुरस्कारासाठी आमदार यशवंतराव गडाख यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती मुद्रणालयाचे अध्यक्ष अंकुश काकडे यांनी दिली.

नरुभाऊ लिमये यांच्या सहकार क्षेत्रातील स्वच्छ प्रतिमेचा आदर्श कार्यकर्त्यांसमोर राहावा, यासाठी हा पुरस्कार दिला जातो. या वर्षी या पुरस्काराच्या निवड समितीत दैनिक 'लोकसत्ता'चे निवासी संपादक मुकुंद संगोराम, 'साहित्य शिवार'चे संपादक जयराम देसाई व 'सकाळ'चे सहयोगी संपादक राजीव साबडे यांचा समावेश होता. दहा हजार रुपये, स्मृतिचिन्ह व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

गडाख यांनी नगर जिल्ह्यातील सहकारी क्षेत्रात काम केले असून, ९ वर्षे खासदार म्हणून काम पाहिले आहे. मुळा सहकारी साखर कारखान्याची स्थापना

त्यांनी केली असून, इतर संस्थांमध्ये विविध पदेही भूषविली आहेत.

७०व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. त्यांच्या 'अर्धविराम' आत्मचरित्राला अनेक पुरस्कारही मिळाले आहेत.

*** चेतना पुस्तकालयाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार**

वसईच्या जीवन विकास मंडळाच्या चेतना पुस्तकालयाला यंदाचा ग्रामीण विभागातील सर्वोत्कृष्ट 'अ' वर्गीय वाचनालयाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार मिळाला. वसई तालुका चेतना पुस्तकालयाला ज्यांच्यामुळे पुरस्कार मिळाला ते कार्यकर्ते सुनील रॉड्रिग्ज, पीटर दोडती, फिलीप दोडती, नेल्सन दोडती, ग्रंथपाल दोडती, सहाय्यक ग्रंथपाल बेलिंदा वाझ आदींसह विविध क्षेत्रात विशेष कामगिरी केलेल्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. दीपक देसाई यांनी संस्थेच्या कार्याचा गौरव करून वार्षिक पा हजार रुपयांची देणगी ग्रंथालयाचा जाहीर केली.

*** डॉ. वसंत जोशी यांना कानडे पुरस्कार जाहीर**

यंदाचा डॉ. मु. श्री. कानडे पुरस्कार, संत साहित्याचे अभ्यासक डॉ. वसंत स. जोशी यांना जाहीर करण्यात आला आहे. दहा हजार रुपये रोख व मानपत्र, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यापूर्वी या पुरस्काराने किसनमहाराज साखरे, डॉ. शं. गो. तुळपुळे, डॉ. म. रा. जोशी, डॉ. वा. य. गाडगीळ, डॉ. प्र. न. जोशी, डॉ. व. दि. कुलकर्णी यांना गौरवित करण्यात आले आहे. यंदा पुरस्काराचे चौदावे वर्ष आहे.

*** विजय पाडळकर यांना केशवराव कोठावळे पुरस्कार**

मराठी साहित्यात मानाचे समजले जाणारे केशवराव कोठावळे पारितोषिक यंदा विजय पाडळकर यांच्या 'कवडसे पकडणारा कलावंत' (चेकॉव्ह आणि त्याची कथा) या पुस्तकाला मिळाले आहे. मॅजेस्टिक प्रकाशनाचे संस्थापक केशवराव कोठावळे यांच्या स्मृतिदिनी पाच मे रोजी पुण्यात देण्यात आला.

निवड समितीवर सुभाष भेंडे, विलास खोले आणि अरुणा ढेरे होते. पाडळकर यांनी या पुस्तकात चेकॉव्ह या जगविख्यात लेखकाच्या आयुष्याचा व लेखनाचा वेध घेतला आहे. कला आणि जीवन यांचा अन्वय लावणारे प्रगल्भ लेखन पाडळकरांनी रसिकांना दिले असे समितीने म्हटले आहे.


*** सुषमा देशपांडे चीनला रवाना**

चीनमधील शांघाय येथे आयोजित करण्यात आलेल्या पाचव्या आशियाई महिला रंगभूमी परिषदेत भाग घेण्यासाठी नाट्यअभिनेत्री सुषमा देशपांडे चीनला रवाना झाल्या आहेत. नाट्यक्षेत्रातील सद्यस्थितीतील सामाजिक प्रगती आणि व्यावसायिक विकास हा या परिषदेचा मुख्य विषय आहे.

*** सुप्रिया वकील यांच्या 'उत्सव'ला अंकुर वाङ्मय पुरस्कार**

महाराष्ट्राच्या साहित्य क्षेत्रात गेल्या पंधरा वर्षापासून कार्यरत असलेल्या अकोल्याच्या अंकुर साहित्य संघातर्फे दरवर्षी अंकुर वाङमय पुरस्कार देण्यात






येतात. सन २००४ च्या अंकुर वाङमय पुरस्कारासाठी सौ. सुप्रिया वकील यांच्या 'उत्सव' या काव्यसंग्रहाची निवड झाली आहे. सदर संघामार्फत विविध साहित्यप्रकारांसाठी पुरस्कार दिले जातात. त्यापैकी 'केवळ महिलांसाठी' दिला जाणारा 'स्व. विमलताई बेलसरे स्मृती काव्य पुरस्कार' सौ. वकील यांना विभागून देण्यात येणार आहे. यंदाच्या ३४व्या राज्यस्तरीय अंकुर मराठी साहित्य संमेलनात पुरस्कार वितरण होणार आहे. **'उत्सव'** हे पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झालेले आहे.

*** अमेरिकी विद्यापीठाची किरण बेदींना 'डॉक्टरेट'**

अमेरिकेतील 'सिटी युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क'च्या कायदा अभ्यास विभागाने भारतातील ज्येष्ठ पोलिस अधिकारी किरण बेदी यांना सन्माननीय डॉक्टरेट पदवी प्रदान केली आहे. पोलिस आणि तुरुंग यंत्रणांमध्ये मानवी दृष्टिकोनातून घडविलेल्या सुधारणांबद्दल त्यांचा हा गौरव करण्यात आला आहे. विद्यापीठातील विद्यार्थी व अध्यापकांनी त्यांची या मानद पदवीसाठी एकमताने निवड केली. ❐

## किताब

किताब हो सकती है
ऐसा दोस्त
देता नही जो दगा
बिछुड़ती नही है जो
निभा सकती है किताब
जिन्दगी भर की यारी ।

किताब के साथ
रोते है हम
किताब देती है ज्ञान
सदाचार का
करती है आगाह
कदाचार से ।

हँसते और चहकते भी
बहलाती है किताब ।
सहलाती है दिल, ललाट
अपने को पाते हैं किताबमें
अपने को,दुनिया को
पहचानने में
मदद करती है किताब

अवचेतन की गुफा के द्वार तक
पहुँचाती है किताब
किताब हो सकती है
दृष्टि का उन्मेष
घटित कर सकती है
जीवन मे क्रान्ति

**डॉ. रमेशकुमार त्रिपाठी**

साधंसुधं...

# परकेपण माझे कळो आले...

प्रमोदिनी वडके-कवळे

काव काव मागच्या अंगणातल्या चाफ्यावर बसलेला कावळा रोजच्यासारखाच ओरडला. मी आणि धाकटा भाऊ पायरीवर आंबा खात बसलो होतो. आधी बोटांना लागलेला रस नीट चाटून घेऊन, मग आम्ही दोघांनीही त्या कावळ्यावर हात उगारले... ''काव काव... पाहुणे येणार असतील तर उडून जाव''

आमच्या दरडावणीला भीक न घालता तो कावळा तिथेच बसून राहिला. पण तुळशीला पाणी घालणारी आई मात्र हसून म्हणाली,''त्या बिचाऱ्या कावळ्याला कशाला हाकलता? आज आपल्याकडे पाहुणे येणारच आहेत.'' आम्ही दोघांनी आनंदून एकमेकांकडे बघितलं. गेले कित्येक दिवस आम्ही रोजच कावळ्याला धमकावत होतो आणि कावळा उडूनही जात होता. पण ती पाहुणे नामक आम्ही न पाहिलेली व्यक्ती काही येत नव्हती. आज मात्र आमची तपश्चर्या फळाला आलेली दिसत होती. हातातल्या आंब्याची कोय पांढरी होईपर्यंत चोखून, तिचा दाढीमिशीवाला साधू करायचं विसरून, आम्ही ती तशीच फेकून दिली आणि उंबरठ्यावर बसून पाहुण्यांची वाट पहात राहिलो.

आम्हाला फार वेळ वाट पहावी लागली नाही. थोड्याच वेळात समोरून अण्णा येताना दिसले आणि त्यांच्या मागून मामा, मामी आणि त्यांची दोन मुलं...

फुस्स. म्हणजे पाहुणे आलेच नाहीत की काय?

''आई ग, नुसते मामा मामीच आलेत. पाहुणे नाहीच आले.'' मी घरात येऊन आईला बिलगले.

''अग तेच पाहुणे...'' आई म्हणाली.

''ते कसे पाहुणे? नेहमीचे मामामामीच तर आहेत ते.''

मामामामीची सरबराई करण्याच्या घाईत असल्यामुळे आईला माझ्यावर खेकसायला वेळ मिळाला नाही म्हणून. नाहीतर त्या दिवशी वैतागून तिने मला धपाटाच घातला असता. आईअण्णांपेक्षाही जास्त आवडणारे मामामामी म्हणजेच पाहुणे हे काही केल्या मला पटत नव्हतं. आपल्याच ओळखीच्या माणसांना पाहुणे का म्हणायचं? हा मनातला गोंधळ संपत नव्हता.

नंतरही कितीतरी वर्ष तो संपला नाहीच...

पाहुणा शब्दाचा अर्थ कितीतरी वर्षे मला चकवतच राहिला.

आमच्या वर्गातल्या तारा शिंदेच्या बहिणीचं नुकतंच लग्न झालं होतं. एक दिवस ती मला म्हणाली, ''उद्या आम्ही सगळे ताईकडे पाहुण्यांच्यात जाणार आहोत.''

''ताईकडे आणि पाहुण्यांच्यात? म्हणजे?'' पुन: माझा अडाणी प्रश्न.



''सोयरे लोकांना पाहुणे म्हणतात.'' तिने माझ्या अज्ञानाची कीव केल्यासारखी चर्या करून सांगितलं. माझ्या मनातल्या गोंधळात आणखी एका अर्थाची भर पडली.

आजीच्या कहाण्यांमधे नेहमी अतिथी हा शब्द असायचा. आजीने त्याचा अर्थही पाहुणा असाच सांगितला होता. पण शाळेत व्याकरण शिकताना कळलं, ज्याच्या येण्याची निश्चित तिथी नसते तो अतिथी. अभ्यागत हाही एक असाच व्याकरणातून कळलेला नवा पाहुणा.

आचार्य अत्र्यांची पाहुणे ही विडंबन कविता आम्हाला अभ्यासाला होती. ती शिकवताना बाईंनी मूळची कविता मिळवून आधी ती शिकवली होती. फुलावरले दवबिंदू बघून मुलाला नवल वाटते आणि तो विचारतो, ''कोठूनी आले हे येथे? काल संध्याकाळी नव्हते.''

या ओळी शिकवताना ते दवबिंदू या मुलाला अनोळखी आहेत आणि अतिशय कोमल आणि सुंदर असल्यामुळे हवेहवेसेही आहेत असं चित्र बाईंनी आमच्या डोळ्यासमोर उभं केलं होतं. त्या तरल भावनेचा परिणाम मनावर ताजा असतानाच पाहुणे कविता शिकवली गेल्यामुळे त्यातलं विडंबन मनापर्यंत पुरतं पोचलं नव्हतं आणि पाहुणे हीसुद्धा एक हवीहवीशी व्यक्ती असावी असं मला वाटत होतं.

तरुण वयात चोरून वाचलेल्या कादंबऱ्यांनी आणि हिन्दी सिनेमांनी या समजुतीत वेळोवेळी भरच घतली होती. आनेवाला छोटा मेहमान आणि खानेमे बनायी गयी खीर याच तमाम भारतीयांच्या मनातलं अतूट समीकरण अजूनही तसंच आहे. मग माझ्या मनातली ती शंका तरी कशी फिटणार?

पण जगाचा भलाबुरा अनुभव नसलेलं ते कोवळं वय संपलं आणि वाढत्या वयाबरोबर पाहुणे ही दरवेळीच हवीहवीशी गोष्ट नसते, किंबहुना बरेचदा ती नकोनकोशीच असते याचं ज्ञान आपोआप आलं.

संसारात पडल्यावर तर पाहुणा शब्दाबद्दलचा आणखीच गोंधळ वाढला. मुंबईहून इंटरव्ह्यूसाठी आलेल्या, पण मामाच्या घरात हक्काने वावरून स्वत:ची सोय साधून घेणाऱ्या नणंदेच्या मुलाला पाहुणा म्हणायचं.. आणि कधीही, कितीही, दिवसांसाठी येऊन राहणाऱ्या नातेवाईकांसाठी स्वत:ची रजा, आरोग्य आणि मन:स्थिती यांच्याशी तडजोड करून, स्वत;च्याच पगारातून हप्ते भरलेल्या घरातही, अहोरात्र तारेवरून चालणाऱ्या गृहिणी नामक डोंबारणीला मात्र घरची म्हणायचं हे उलटं गणित माझ्या मद्द बुद्धीला उमजणारं नव्हतंच.

शिवाय आपण कुठे पाहुणं म्हणून जायचं ठरवलं की, होणारी गोची निराळीच असायची. चहा झाला की तिथली यजमान गृहिणी लगेच मटारची टोकरी नाहीतर कोथिंबिरीची जुडी पुढे सरकवायची...''जरा एवढं निवडून देता?''

वर ''तुम्हाला असं हक्काने काम सांगायला काही वाटत नाही बघा... तुम्ही घरच्यासारख्याच वाटता. पण परवा त्या ह्या आल्या होत्या

ना तेव्हा...'' अशी मखलाशी.

आपलंही त्या ह्यांच्यासारखं व्हायला नको म्हणून पाहुणेपद सोडून मला पदर खोचणं भाग पडायचं. किंवा आमच्या घरी आल्यावर ''मला पानात वांगं अगदी नक्कोसं वाटतं. आणि ह्यांना कश्शातही बटाटा चालत नाही.'' म्हणून आयत्यावेळी माझी गैरसोय करणाऱ्या बाईच्या घरी आपणही तशाच पाहुणचाराच्या अपेक्षेनं जावं तर, ''तुम्ही येणार ते ठाऊक होतं. पण आज भाजी आणायला जमलं नाही. म्हणून पापडखिचडीचाच बेत केलाय. म्हटलं, तुम्ही थोड्याच पाहुण्या आहात? घरातल्यासारख्याच.'' म्हणत माझ्या पाहुणेपणावर पाणी ओतलं जायचं.

या सगळ्या अनुभवातून पाहुणा या शब्दार्थाचं गूढ उकललं गेलं नाही तरी, भिडस्त स्वभावाच्या माणसाचं स्वत:च्या घरातलं पाहुणेपण कधी संपत नाही आणि त्याला दुसऱ्याच्या घरातला अतिथीही होता येत नाही हे सत्य मात्र मला कळून चुकलं.

होस्टेलवरची पार्टनर वीस वर्षांनंतर अचानक रस्त्यात भेटली. आंबडगोड मैत्रीचे ते गाभूळलेले दिवस पुन: आठवले. कोण कुठे, कोण काय करतंय याच्या जुजबी चौकशा, फोन नंबरची देवाणघेवाण झाली आणि नंतरच्या आठवड्यात तातडीने सगळ्यांनी मिळून कोल्हापूरच्या मैत्रिणीला भेटायला जायचा निर्णय घेतला गेला.

शनिवारी ऑफिसमधली आणि घरची ड्यूटी संपवून रात्रीच्या महालक्ष्मी एक्सप्रेसने पुण्याहून आम्ही तिघी निघालो. सकाळी सात वाजता कोल्हापुरात. तिथल्या मैत्रिणीला आनंदाश्चर्याचा अनपेक्षित धक्का द्यायचा म्हणून आम्ही येत असल्याचं मुद्दामहून कळवलं नव्हतं. फक्त फोन करून ती घरात असल्याची खात्रीच तेवढी करून घेतली होती.

आम्हाला असं अचानक आलेलं बघताच अपेक्षेप्रमाणे मैत्रिणीला आनंदाश्चर्याचा जोरदार धक्का वगैरे बसला. तो ओसरल्यावर मधल्या वीस वर्षातल्या गप्पांची कसर भरून काढत सगळ्यांचं चहापाणी झालं आणि मग तिला स्वत:च्या प्रापंचिक जबाबदारीचं भान आलं. तिची बाई येत नव्हती म्हणून मोरीतला खरकट्या भांड्यांचा ढीग अद्याप तसाच पडलेला होता. हॉस्पिटलमधे असलेल्या तिच्या सासूबाईंना बारा वाजेपर्यंत जेवणाचा डबा द्यायचा होता. शिवाय रविवार म्हणून आठवड्याची कामं करून ठेवायची होती ती वेगळीच...

मग काय? आम्ही चौघीही कामाला लागलो. वरणभात, दोन भाज्या, कोशिंबीर, पोळ्या, आमच्यासाठी पक्वान्न म्हणून श्रीखंड असा चारीठाव स्वयंपाक उरकला. हातासरशी तिच्या मोरीतली तिला भीती दाखवणारी भांडीही नेस्तनाबूद करून टाकली. धुण्याचं मशीन लावलं... सगळं उरकून बारा वाजता ती हॉस्पिटलमधे जायला आणि आम्ही अंबाबाईचं दर्शन घ्यायला बाहेर पडलो.

दुपारी तीन वाजता आमची जेवणं झाली. खरं म्हणजे डोळ्यावर पेंग येत होती. रात्रीचं जागरण डोळ्यात चुरचुरत होतं. तरीही पुन: गप्पांचं सत्र रंगलं. तिच्या आठवड्याच्या भाज्या निवडत आणि दळण करून देत संध्याकाळचा चहा झाला. रात्रीची जेवणं, नंतरच्या भांडी घासण्यासहित मागचं आवरणं... सगळं सगळं आम्ही सहकार तत्त्वावर केलं आणि पुन: रात्री दहा वाजता परतीच्या गाडीत बसलो.

दुसऱ्या दिवशी ऑफिसमधल्या सख्यांना आमच्या या अचानक भेटीची हकिकत उत्साहाने सांगता सांगता अचानक माझ्या लक्षात आलं, काल एवढी दमणूक होऊनही आज आपण नेहमीपेक्षा जास्त ताज्यातवान्या आहोत. नाहीतर दर रविवारी घरातला ओव्हर टाईम पार पाडून सोमवारी आपली अगदी शिळी पालेभाजी होऊन गेलेली असते.

आणि मग हेही आठवलं की दर रविवारी घरी जी कामं करतो तीच कामं कालही केली होती. शिवाय यावेळी जोडीला गप्पांचा थकवा आणि प्रवासाची दगदग होती. तरीही...

आश्चर्याने अंतर्मुख होऊन आजच्या प्रसन्नतेचं कारण शोधताना मला जाणवलं, हवीहवीशी मन:स्थिती आणि श्रमातली अलिप्तता या दोन खांबावर माझा कालचा दिवस तोलला गेला होता. ते दोन खांब खरं म्हणजे पूर्णपणे परस्परविरोधी होते. पण त्या विरोधाभासातच आजच्या माझ्या प्रसन्न मन:स्थितीचा उगम होता. मैत्रिणीच्या घरचं काम मी आपलेपणाने केलं होतं. खरं, पण त्यात कुठेही जबाबदारीचं ओझं नव्हतं, तर केवळ मैत्रीची आणि मदतीचीच भावना होती. त्या कामांच्या परिणामाच्या जबाबदारीने मी दबलेली नव्हते कारण मी तिथली पाहुणी होते... म्हणूनच धावपळीचा दिवस असूनही मला त्यातून केवळ आनंदच मिळाला होता.

आणि इतकी वर्ष शोधत असलेली पाहुणेपणाची व्याख्या मला त्याक्षणी नकळत सापडून गेली. 'इदं न मम' अशा भावने आणि तरीही मनापासूनच्या आनंदाने सगळे ताण सैलावून वावरता येणं हेच आपलं पाहुणेपण असतं. घरात आपण नेमकं याच्या उलट करत असतो. 'हे माझंच!' अशा हक्काच्या भावनेच्या ताणापायी कामातल्या आनंदाचं ओझं कधी बनून जातं ते आपल्या लक्षातही येत नाही.

ऑफिसच्या ठराविक वेळेनंतर ऑफिसमधे थांबून काम करताना अशाच सैल प्रसन्न मन:स्थितीचा अनुभव येतो. कारण त्यावेळी आपलं नेहमीचं कर्मचारीपण संपवून आपण तिथले पाहुणे झालेले असतो. माहेरपणाला आलेली मुलगी, शाळेतला सुटीच्या दिवशी घेतलेला तास, शेजारणीच्या घरच्या कार्यात राबणारी गृहिणी, दुसऱ्याचा गृहपाठ हौसेने करून देणारा मुलगा या पाहुणेपणाच्या आनंदाचे कितीतरी धनी डोळ्यासमोर आले. आणि मग त्यापाठोपाठ पुन: एक नवं प्रश्नचिन्हही मनात उगवलं...

अलिप्तपणा आणि हक्काची भावना यांची उलटापालट न करता, अवघ्या आयुष्याकडेही या पाहुणेपणाच्या नजरेनं पाहिलं तर?

❐

# श्रद्धांजली

### * डॉ. प्रकाश परांजपे

ज्येष्ठ आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. प्रकाश विष्णू परांजपे (वय ५६) यांचे २० एप्रिल रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

डॉ. परांजपे यांनी बीएएमएस आणि एमबीबीएस अशा दोन्ही पदव्या संपादन केल्या होत्या. लठ्ठपणा या विषयावर आयुर्वेदातील डॉक्टरेट त्यांनी मिळविली होती. तारुण्य पीटिका या विषयावरील त्यांचा शोधनिबंध अमेरिकन जर्नलमध्ये प्रकाशित झाला होता. येथील पूना हॉस्पिटलमध्ये ते आयुर्वेद सल्लागार म्हणून कार्यरत होते. नानल रुग्णालय आणि आयुर्वेद रसशाळेत ते आयुर्वेदातील विविध विषयांवर संशोधनाचे कार्य करित होते. डॉ. परांजपे यांनी इंग्रजी व मराठी भाषेत अनेक पुस्तके लिहिली आहेत. 'गालातल्या गालात' या त्यांच्या पुस्तकाला राज्य शासनाचा विनोदी साहित्यासाठीचा पुरस्कारही मिळाला होता. 'फरगॉटन हिलर इंडियन मेडिसिनल प्लांट्स', 'आयुर्वेदिक मेडिसिन्स द लिव्हिंग ट्रॅडिशन्स', 'आयुर्वेदिक होम रेमिडिज', 'हर्ब्ज फॉर ब्युटी' 'तारुण्य पीटिका', 'मूळव्याध', 'निसर्गदान', 'बहुगुणी वनस्पती', 'हसा आणि बरे व्हा', 'आरोग्यदायी मध', 'सौंदर्यासाठी आयुर्वेद', 'लठ्ठपणा कमी करा', 'आजी-आजोबांसाठी आयुर्वेद' ही पुस्तके त्यांनी लिहिली होती.

### * कादंबरीकार बियन चव्हाण

सुप्रसिद्ध विनोदी लेखक, ज्येष्ठ कादंबरीकार बी. एन. ऊर्फ बियन चव्हाण यांनी २४ एप्रिल रोजी वसई येथील निवासस्थानी स्वत:ला जाळून घेऊन आपल्या एकाकी जीवनाचा अंत करून घेतला.

अविवाहित असलेले चव्हाण ६० वर्षांचे होते. उपनगरी प्रवासी जीवनाचे प्रभावी चित्रण करणाऱ्या त्यांच्या 'बडफास्ट' या कादंबरीने बियन चव्हाण हे नाव महाराष्ट्रास सुपरिचित झाले. 'प्रमोशन'हा त्यांचा पहिला कथासंग्रह. त्यांच्या 'नराधम', 'यातनाचक्र', 'पाच प्रकरणांची कहाणी', 'सॉरी', 'ज्वालामुखी', 'दरिद्री नारायण' 'हौसफूल' इत्यादी सुमारे २५ कादंबऱ्या प्रकाशित असूनही ते प्रसिद्धीच्या झोतापासून लांब राहिले.

### * सुनील कोठावळे

मॅजेस्टिक प्रकाशनच्या केशवराव कोठावळे यांचे बंधू तुकारामशेठ कोठावळे यांचे चिरंजीव सुनील कोठावळे यांचे नुकतेच निधन झाले. मॅजेस्टिक एजन्सी दादर येथे त्यांनी अनेक वर्षे काम पाहिले. अनिल कोठावळे यांचे ते ज्येष्ठ बंधू होत.